# ।। सबका मालिक आत्मा ।।

सर्व देवांचा देव आत्मा! आत्मा प्रत्येक हृदयात असतो.



**श्री दत्त जयंती**

निमित्त

सर्व आत्मप्रेमी भाविकांना

**हार्दिक शुभेच्छा!**



## आत्मा (SOUL)

।। हृदयामध्ये आत्म्यावरती प्रेम करण्याची कला म्हणजे ध्यान ।।

आत्मचिंतनाद्वारे

विश्वशांतीचा संदेश देणारे मासिक

।।ॐ गुरुदेव।।

# आत्मा मालिक

डिसेंबर - २०२४

॥ सबका मालिक आत्मा ॥



# ॥ अमृतवाणी ॥

या जगात एकच सत्य आहे आणि ते म्हणजे आत्मा. जगातील सर्व वस्तू नष्ट होतील, सृष्टीत असंख्य घडामोडी होतील, पण आत्मा हा चिरकाल टिकेल. कारण त्याला आदिही नाही आणि अंतही नाही. अनादि कालापासून आत्मतत्त्व चालत आलेले आहे आणि अनंतकाळापर्यंत असेच चालत राहील. कारण तो अमर आहे. सर्व देवांच्या उत्पत्तीपूर्वी आत्मा अस्तित्वात होता म्हणून आपण आत्म्याची पूजा केली पाहिजे. आत्म्यावर प्रेम केले पाहिजे. तसेच क्षणभर केलेले आत्मचिंतन कितीतरी श्रेष्ठ आहे. आत्म्याची पुजा केल्यास ती सर्व देवांची पूजा होते.

ईश्वरप्राप्तीचा सर्वात साधा, सोपा आणि सहज मार्ग म्हणजे आत्मचिंतन. कारण ईश्वर आत्म्याच्या स्वरुपात प्रत्येकाच्या, हृदयात बसलेला आहे. नुसतं रुपाला न पाहता 'स्व-रुपाला' पहा आणि ईश्वर प्राप्ती करुन घ्या.

आत्मा हा निर्गुण आणि निराकार आहे. त्याला पाहण्यासाठी कोणत्यातरी सगुण साकार रुपाची आवश्यकता असते. म्हणून कोणत्याही आकारात निराकाराचे ध्यान करावे. सद्‌गुरुचे आत्मरुपात ध्यान करा. आत्म्याला जात, धर्म नसतो. हिंदू, मुस्लिम, शीख, पारसी सर्वांना आत्मचिंतनाने ईश्वरप्राप्ती होते. भगवान श्रीकृष्ण, येशुख्रिस्त, मोहंमद पैगंबर, गुरुनानक, भगवान महावीर, भगवान गौतम बुध्द या सगळ्यांनी आत्म्याची ओळख करुन घेऊन त्याचे चिंतन केले म्हणूनच ते ईश्वररुप झाले.

## ॥ आत्मा मालिक ॥

''आत्मचिंतनाद्वारे विश्वशांतीचा संदेश देणारे मासिक''

# मासिक ॐ गुरुदेव

वर्ष २३ वे अंक १२ वा डिसेंबर २०२४ ● RNI-MAHMAR/2001/4853

**संस्थापक संपादक**

हृदयनिवासी संत सच्चिदानंद महाराज
हृदयनिवासी संत देवानंद महाराज

**संपादक**

संत परमानंद महाराज
मो. ९५९५९७०२२०, ९९२२०७०२२०

**संपादकीय सल्लागार**

श्री. नंदकुमार सूर्यवंशी
श्री. भगवान दौंड
श्री. हनुमंत भोंगळे

**मार्गदर्शक**

संत निजानंद महाराज
संत विवेकानंद महाराज

**प्रसादालय विभाग (अखंड अन्नदान छत्र)**

श्री. प्रकाश भट, मो. ८६०५४६४५५५
श्री. बाळासाहेब गोर्डे, मो. ७५८८६९४०७४
श्री. प्रकाश गिरमे, मो. ९८५०३३८०५५

**धर्मशाळा (निवास व्यवस्था)**

कुमार पाटील, मो. ९९२२२२८६५५
विलास गायकवाड, मो. ९९२२१७४२११

**जनसंपर्क**

पराग धुमाळ (ध्यान योग मिशन कार्यालय)
मो. ७५८८६९४०८४, ८३८००३९३०५

संपादकीय - अज्ञानातून मुक्ती - संत परमानंद महाराज ४

प्रत्येक मानवात चतुर्वर्ण -डॉ. विजय बाणकर ६

हरिपाठाच्या गाभाऱ्यात : संत एकनाथ (भाग ७) - नामदेव सदावर्ते ११

अकोल्यातील दत्तोपासकांची परंपरा - डॉ. सुनील शिंदे १६

घडो त्याचा समागम -बंडोपंत कुलकर्णी १९

त्रिमूर्ती अवतार श्रीगुरु दत्तात्रय -बी. के. गायकवाड २१

स्वाध्याय - नीता एवं नरेश यादव २४

या अंकात प्रसिध्द झालेल्या लेखांतील मतांशी संपादक, प.पू. गुरुदेव माऊली, आश्रम संत, पदाधिकारी, मुद्रक आणि प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. (वादप्रतिवाद कोपरगांव न्यायकक्षेत.)

ॐ गुरुदेव हे मासिक संपादक, मालक व प्रकाशक संत परमानंद महाराज, विश्वात्मक जंगली महाराज आश्रम ट्रस्ट, मु.पो. कोकमठाण यांनी मुद्रक संतोष दत्तात्रय माळी, श्री ग्राफिक्स, गांधीनगर रोड, कोपरगांव, जि. अहमदनगर-४२३६०१ येथे मुद्रीत करुन विश्वात्मक जंगली महाराज आश्रम ट्रस्ट, मु.पो.कोकमठाण, ता. कोपरगांव, जि. अहमदनगर-४२३६०१ येथे प्रकाशित केले.

सर्व देवांचा देव आत्मा! आत्मा हा प्रत्येकाच्या हृदयात निवास करतो व तो ध्यानाने प्राप्त होतो.



## संपादकीय

## अज्ञानातून मुक्ती

या जगात तीन प्रकारची दुःखे आहेत. अध्यात्मिक, आधिभौतिक आणि आधिदैविक. ही ती त्रिविध दुःखे किंवा त्रिविध ताप होत. आध्यात्मिक दुःखे म्हणजे भौतिक शरीर व मन यांपासून होणारी दुःखे. इतर प्राण्यांपासून किंवा जीवांपासून होणारी दुःखे ही आधिभौतिक तर निसर्गातील शक्तिंमुळे होणारी ती आधिदैविक दुःखे होत. जीवाला दुःखे का भोगावी लागतात, तर त्याचे उत्तर आहे अज्ञानामुळे. यासाठीच गुरूने शिष्याला अज्ञानापासून मुक्त करणे आवश्यक ठरते.

**-संत परमानंद महाराज**

अज्ञान म्हणजे काय? असाक्षर व्यक्तिला आपण अनेकदा अज्ञानी म्हणतो. पण, साक्षर-शिकलेल्याचा ज्ञान-अज्ञान याच्याशी काही संबंध नाही. ज्ञान हे केवळ पुस्तकातूनच मिळते असे नाही. ज्ञान मिळविणे ही जशी आपली मूलभूत वृत्ती आहे, तसे अज्ञानी असणे हाही जीवाचा स्वभाव आहे. या अज्ञानातून ज्ञानाकडे प्रवास करणे महत्त्वाचे असते. अज्ञान या शब्दावरून ज्ञानाचा अभाव किंवा अंधकार असा बोध होतो. जर खोलीतले सर्व दिवे एकदम मालवले, तर आपण नेमके कुठे बसलो आहोत, हेसुद्धा आपल्याला सांगता येणार नाही. त्याचप्राणे आपण या सर्व तमोमय प्राकृत जगात अंधकारात आहोत. तमस किंवा तिमिर म्हणजे अंधकार. हे प्राकृत जग अंधकारमय आहे. म्हणून या जगताला प्रकाशित करण्यासाठी सूर्यप्रकाशाची किंवा चंद्रप्रकाशाची आवश्यकता आहे. तथापि, दुसरे एक अध्यात्मिक जगत आहे व ते अंधकाराच्या पलिकडे आहे. श्रीकृष्णांनी त्या जगताचे वर्णन गीतेत केले आहे.

**न तद्भासयते सूर्यो न शशाङ्को न पावकः।**
**यद्गत्वा न निवर्तन्ते तद्धाम परमं मम।।**

अर्थ- त्या माझ्या परमधामाला सूर्य, चंद्र तसेच अग्नी किंवा वीज प्रकाशित करीत नाही. जे त्या धामाला पोहचतात, ते पुन्हा या भौतिक जगतात परत येत नाहीत.

गुरूचे काम आपल्या शिष्यांना अंधकारातून प्रकाशात आणणे हे आहे. ज्याप्रमाणे एखाद्या मनुष्यात अज्ञानामुळे रोगाचा प्रादुर्भाव होतो, त्याप्रमाणे सध्या प्रत्येकजण अज्ञानामुळे दुःख भोगत आहे. जर मनुष्याला आरोग्याचे नियम माहीत नसतील, तर कोणती वस्तू वा पदार्थ आपल्याला दूषित करील, हे त्याला कळणार नाही. म्हणून अज्ञानामुळे कोणत्यातरी रोगाचा संसर्ग होतो व त्या रोगामुळे आपण दुःख भोगतो. ज्या मुलाला अग्निमुळे मनुष्य भाजतो, हे माहीत नसते, तो जेव्हा अग्नीला स्पर्श करतो, तेव्हा अग्नी असा विचार करीत नाही की, हे मूल आहे. मी याला जाळतो हे याला माहीत नाही. म्हणून अज्ञान ही सबब चालत नाही. निसर्गाचे कायदे कडक असतात. आपल्याला जरी त्याचे ज्ञान नसले तरी ते आपले काम चोख करीत असतात. आपण हा कायदा मोडला तर आपल्यावर दुःख भोगण्याची वेळ येते.

या जगात तीन प्रकारची दुःखे आहेत. अध्यात्मिक, आधिभौतिक आणि आधिदैविक. ही ती त्रिविध

**सर्व देवांचा देव आत्मा! आत्मा हा प्रत्येकाच्या हृदयात निवास करतो व तो ध्यानाने प्राप्त होतो.**

दुःखे किंवा त्रिविध ताप होत. आध्यात्मिक दुःखे म्हणजे भौतिक शरीर व मन यांपासून होणारी दुःखे. इंतर प्राण्यांपासून किंवा जीवांपासून होणारी दुःखे ही आधिभौतिक तर निसर्गातील शक्तिंमुळे होणारी ती आधिदैविक दुःखे होत. जीवाला दुःखे का भोगावी लागतात, तर त्याचे उत्तर आहे अज्ञानामुळे. यासाठीच गुरूने शिष्याला अज्ञानापासून मुक्त करणे आवश्यक ठरते. दुःख हे अज्ञानामुळे निर्माण झालेले आहे, हे गुरूला माहीत असते. गुरू अज्ञानांधकाराने व्यापलेल्या जीवांसमोर ज्ञानदीप नेता. यामुळे जीवाची अज्ञानाच्या अंधकारातून मुक्तता होते.

गुरूचा शोध घ्यावा, असे वेदांनीही सांगितले आहे. गुरू करणे ही काही फॅशन नव्हे. ज्याला आध्यात्मिक जीवन समजून घ्यायचे आहे, त्याला गुरूची आवश्यकता आहे. गुरू एक आवश्यक गोष्ट आहे. मनुष्याने आध्यात्मिक जीवन, परमेश्वर, योग्य कर्म आणि मनुष्याचा परमेश्वराशी संबंध याविषयी ज्ञान घेण्याबद्दल गंभीर असले पाहिजे. जेव्हा या विषयांचे ज्ञान समजून घेण्याविषयी आपण आस्था बाळगू तेव्हाच आपल्याला गुरूची आवश्यकता कळून येईल. गुरूला शरण गेले पाहिजे. कारण, अशी शरणागती पत्करल्याशिवाय आपण काहीही ज्ञान मिळवू शकत नाही.

त्यामुळे सद्‌गुरूंना शरण जावे. त्यांच्या चरणांशी लीन व्हावे व आत्मज्ञानाच्या सागरातील काही मोती आपल्या हाती कसे लागतील, यासाठी प्रयत्न करावेत. यासाठीचा मार्ग ध्यानाच्या माध्यमातून जातो. त्यामुळे ध्यान करा, ध्यानी बना.

आत्मा मालिक।

**- संत परमानंद महाराज,**
संपादक

***

सर्व देवांचा देव आत्मा! आत्मा हा प्रत्येकाच्या हृदयात निवास करतो व तो ध्यानाने प्राप्त होतो.



## प्रत्येक मानवात चतुर्वर्ण

शैशवावस्थेत, बाल्यावस्थेत व किशोरावस्थेत व्यक्ती आज्ञाधारक, नम्र व सेवाभावी असते, तिचा अद्याप विकास व्हावयाचा असतो, ही शूद्र लक्षणे होत. या शूद्रावस्थेनंतरच्या ४०व्या वर्षापर्यंतचा काळ धनार्जनात, विविध प्रकारच्या शारीरिक मानसिक उपभोगांत तसेच गृहस्थाच्या जबाबदाऱ्या पार पाडण्यात व्यतीत होतो. व्यापार-उद्योग करणाऱ्या वैश्याप्रमाणे गृहस्थाश्रमी व्यक्ती व्यग्र, उद्योगरत वा व्यस्त असते म्हणजे वैश्य असते. यानंतरच्या क्षत्रियावस्थेत म्हणजे वयाच्या ६०व्या वर्षापर्यंत व्यक्तीच्या जबाबदाऱ्या व शक्ती यांचा व्यापक विकास होत असतो.

**-डॉ. विजय बाणकर**

**'मॅन हिमसेल्फ इज द क्राऊनिंग वंडर ऑफ क्रिएशन;**
**द स्टडी ऑफ हिज नेचर द नोबलेस्ट स्टडी द वर्ल्ड फॉर्ड्स.'**
**(ग्लॅडस्टोन)**

'ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य व शूद्र या चार वर्णांची व्यवस्था मी गुणकर्मविभागशः निर्माण केली आहे', असे भगवान श्रीकृष्ण यांनी गीतेत म्हटले आहे,[१] आणि धर्मग्रंथांमधील वचनांचा यथार्थ समजून घेऊन त्याप्रमाणे आचरण करण्यास फक्त साधनसंपन्न व्यक्तीच व खरे संत वा खरे योगीच समर्थ असतात, असे विधान महायोगी श्रीअरविंद घोष यांनी केले आहे.[२] हे विधान ज्यांना लागू पडते असे एक संतयोगी म्हणजे श्रीरामानंद हे होत. त्यांनी चौवर्णसंकल्पनेचा संताभिमत स्वहितकारक अर्थ[३] विशद करून ठेवला आहे.

चौवर्णव्यवस्थेचा आपण सांगत असलेला हा अर्थ वेदशास्त्रांत, उपनिषदांत व संत श्रीज्ञानेश्वरांकडून पूर्वीच सांगितला गेला आहे, असे त्यांनी आपल्या 'दीपरत्नाकर'नामक ग्रंथामध्ये कृतज्ञपणे नमूद केले आहे. ते म्हणतात,

**अ) हा दीपरत्नाकर ग्रंथ। जो उपनिषदांचा मथितार्थ।।**[४]

**ब) हे मत वेदशास्त्राचे।,**[५]

**क) ही माझी युक्ति नव्हे कथनीं। हा ज्ञानेश्वर वदतो वचनीं।**
**चारी वर्ण चहूं देहीं स्थापूनी। स्वहित करोनी घेईजे।।**[६]

**आपले चार देह म्हणजे आपले चार वर्ण :**

विश्वातील प्रत्येक मानवात शूद्र, वैश्य, क्षत्रिय व ब्राह्मण हे चारही वर्ण असतात, असे त्यांनी पटवून दिले आहे. श्रीसद्गुरूंच्या कृपेमुळेच आपल्याला आपल्या देहातच चारही वर्णांचे व त्यांच्या स्वधर्माचे अनुभवगम्य ज्ञान प्राप्त झाले आहे व कुणाही साधकास हे ज्ञान प्राप्त होऊ शकते, असेही त्यांनी सूचित केले आहे. ते म्हणतात,

**'चहु वर्णांचे कर्म सांगितले। जे सद्गुरुकपें अनुभवां आले।**
**आपुले देहींच पाहिजे पाहिले। ज्यासी झाले गुरुज्ञान।।'**[७]

मनुष्याचा पिंड हा चार देहांचा (चतुर्देहात्मक) असतो. पिंडाचे स्थूल, सूक्ष्म, कारण व महाकारण हे देहच आपले अनुक्रमे शूद्र, वैश्य, क्षत्रिय व ब्राह्मण हे चार वर्ण आहेत, असे साधकाने जाणून घ्यावयाचे असते. आपला स्थूल देह हा आपला शूद्र वर्ण होय -

**सर्व देवांचा देव आत्मा! आत्मा हा प्रत्येकाच्या हृदयात निवास करतो व तो ध्यानाने प्राप्त होतो.**

औट हात म्हणजे साडेतीन हात लांबीचे आपले शरीर म्हणजे आपला स्थूल देह होय. स्थूल देह म्हणजेच आपल्या सर्वांचा शूद्र वर्ण होय, असे श्रीरामानंदांनी तीन वेळा उल्लेखिले आहे. कारण, परिचर्या (सेवा शुश्रुषा), तीर्थाटने, व्रताचरणे, अनुष्ठाने, ग्रंथवाचन, कथाकीर्तन, देवीदेवतांचे पूजन, संतसमागम इत्यादि स्थूल प्रकारची भक्ति करणे स्थूल देहामुळेच शक्य होत असते. ही स्थूल भक्तिरूपी सेवा (म्हणजे शूद्रकर्म) निरहंकारपणे केल्यानेच हा देह पावन होतो; अन्यथा तो अपवित्र राहतो, हे आपले वचन सत्य मानावे, असेही त्यांनी विनम्रपणे आश्वासिले आहे.[८]

पृथ्वी, आप, तेज, वायू व गगन या पंचमहाभूतांपासून आपला स्थूल देह निर्माण झालेला असतो. पंचमहाभूतांचे विशिष्ट प्रमाणात एकत्रीकरण होऊन स्थूल देहाच्या ठिकाणी पृथ्व्यादि महाभूतांची अनुक्रमे अस्थि, मांस, त्वचा, नाडी व रोम; लाळ, मूत्र, वसा (अंतःत्वचा), रक्त व मज्ञा; क्षुधा, तृषा, आळस, निद्रा व मैथुन; चलन, वलन, प्रसारण, आकुंचन व निरोधन आणि काम, क्रोध, शोक, मोह व भय ही पंचवीस लक्षणे निर्माण झालेली (होत) असतात.[९]

ही पंचवीस लक्षणे सर्व मानवांच्या ठिकाणी आढळतात व उपरोक्त प्रकारची स्थूल भक्तिकर्मेही सर्व धर्मातले भाविक लोक करीत असतात. यावरून 'स्थूल देह म्हणजे मी' असे समजून वागणारे व वागवणारे सर्व मानव शूद्र असल्याचे स्पष्ट होते.

ब्राह्मण, क्षत्रिय व वैश्य या तीन वर्णांच्या मानवांची सेवा शूद्र वर्णाच्या मानवाने करावी, असे धर्मग्रंथांमध्ये सांगितले आहे. उदाहरणार्थ, **'..वैश्य क्षत्रिय ब्राह्मण। हे द्विजन्मे तिन्ही वर्ण। ययांचे शुश्रुषण। ते शूद्रकर्म।।'**, असे ज्ञानेश्वरीत म्हटले आहे.[१०] परंतु, या ओवीत अभिप्रेत असलेले शूद्र कर्म हे, श्रीरामानंद यांच्या मतें, द्वैतभावनेवर म्हणजे देव आपल्याहून वेगळा आहे या भावनेवर आधारित असून ते केवळ 'बाह्य संपादन' असू शकते व 'जे (हे) **बाह्य व्यवहार करिती जाण। तेणें करूनि हित नोहे।।'**[११], असे त्यांनी स्पष्ट म्हटले आहे. अर्थात, 'मी ब्राह्मण, मी क्षत्रिय, मी वैश्य वा मी शूद्र आहे अशा द्वैतभावनेने व मी इतर वर्णाच्या मानवांहून वेगळा (श्रेष्ठ वा कनिष्ठ) आहे या भावनेने म्हणजे देहाभिमानयुक्त स्वकर्म करणारास आत्मज्ञान वा ईश्वरप्राप्ती होत नसते.

थोडक्यात, स्थूल देहाने शूद्र असलेल्या सर्व मानवांनी निरहंकारपणे विश्वातील सर्व जीवांची सेवा करणे हा त्यांचा श्रेयस्कर स्वधर्म होय. हे स्वहितावह सत्य **'नम्र झाला भूतां। तेणें कोंडिले अनंतां।।१।।'** या अभंगातून श्रीतुकारामांनीही उद्घोषिले आहे.

**आपला सूक्ष्म देह हा आपला वैश्य वर्ण होय -**

आपला सूक्ष्म देहदेखील गगन, वायु, अग्नी, आप व पृथ्वी या पंचमहाभूतांच्या मिश्रणातून होणाऱ्या अनुक्रमे अंतःकरण, मन, बुद्धी, चित्त व अहंकार; व्यान, समान, उदान, प्राण व समान; श्रोत्र, त्वचा, चक्षु, जिव्हा व नाक; वाचा, हात पाय, लिंग व गुद आणि शब्द, स्पर्श, रूप रस व गंध या एकूण पंचवीस तत्त्वांचा झालेला असतो.[१२]

श्रीरामानंद म्हणतात, की या पंचवीस तत्त्वलक्षणांनी युक्त असलेला आपला सूक्ष्म वा लिंग देह म्हणजे आपला वैश्य वर्ण होय. मन-बुद्धी-अहंकार-रूपी भांडवल विश्वातील सर्व मानवांजवळ असते. म्हणून, ते वैश्यदेखील असतात. मन, बुद्धी, अहंकार हे सूक्ष्म देहरूपी वैश्याचे भांडवल असून पंचज्ञानेंद्रिये व पंचकर्मेंद्रिये यांच्याकरवी तो व्यापार-उद्योग करीत असतो. त्यायोगें त्याला अपार सुखदुःख भोगावे लागते. व्यापारी माणूस धनलाभाने आनंदित व तोट्याने दुःखी होतो. त्याप्रमाणे सुखदुःखामुळे सूक्ष्मदेहाच्या (आपल्या मनबुद्ध्यादिकांच्या) ठिकाणी अनुकूल व प्रतिकूल अशा अनेक कल्पनांच्या लहरी उठत असतात. असे होऊ न देतां वैश्यधर्माचे पालन करताना आपण आपले हित ज्यात आहे त्याचप्रकारे सुखदुःखातीत, (स्थितप्रज्ञ, स्थिरबुद्धी, उन्मन) होणे आवश्यक असते.[१३] कारण, जोपर्यंत मनाचे कल्पना करणे थांबत नाही

सर्व देवांचा देव आत्मा! आत्मा हा प्रत्येकाच्या हृदयात निवास करतो व तो ध्यानाने प्राप्त होतो.

तोपर्यंत सुखदु:खाचे आघात होत राहतात आणि मन कल्पनारहित व कल्पनातीत झाले तरच व्यक्ती सुखदु:खातीत होऊ शकते. हे सत्य श्रीबहिणाबाईंनी पुढील अभंगातून सूचित केले आहे -

**'जेथवरी मना तुझा असे वारा। तेथवरी थारा सुखां नाही।।'**[९४]

वृत्ती, द्रव्य, भूमी, राज्य इत्यादिंचा हव्यास करणारांना देव कधी भेटत नसतो, या अर्थाचा श्रीतुकाराम यांचा पुढील अभंगदेखील श्रीरामानंदांच्या विधानाला पुष्टी देतो -

**'वृत्ति भूमि राज्य द्रव्य उपार्जिती।**
**जाणा त्यां निश्चिती देव नाही।।१।।'**

सूक्ष्म देहाला लिंग देह असेही म्हणतात. 'लिंगदेहाचे मर्दन' (= नाश) झाले (झाला) तरच 'जनीं जनार्दन' दिसतो, या श्रीएकनाथकृत विधानातही श्रीरामानंदकृत विधानाला दुजोरा मिळतो.[९५]

थोडक्यात, धनार्जन करीत राहणारा वैश्य-मानव व कल्पना करीत राहणारे मन-बुद्धी हे स्वहिताची साधना करीत नसतात म्हणून ते अध्यात्मशास्त्रदृष्ट्या स्वहितदक्ष वैश्य नसतात; याउलट, आत्मारूपी अक्षय्य धन प्राप्त करणारा व स्थितप्रज्ञताजन्य संतोषरूप धनार्जन करणाऱ्या मानवाचा सूक्ष्म देह हाच खरा स्वहितदक्ष वैश्य असतो.

**आपला कारण देह हा आपला क्षत्रिय वर्ण होय-**

स्थूल व सूक्ष्म हे देह म्हणजे मी असे समजणे हे अज्ञान होय. आपल्या मूळ स्वरूपाबाबत म्हणजे आत्म्याबाबत अज्ञान असणे हेच आपल्या कारण देहाचे स्वरूप होय. कारण-देह हा स्थूल व सूक्ष्म या दोन्ही देहांचे कारण होय. कारण-देहाच्या ठिकाणी आकाश तत्त्वामुळे मद, मत्सर, दंभ, कृत्रिमत्व व अनित्य; वायुतत्त्वामुळे उन्माद, वासना, वांछा, चिंता व चेष्टा; अग्नितत्त्वामुळे निद्रा, मरण, अभिलाष, भ्रम व विस्मरण; आपतत्त्वामुळे करुणा, कल्पना, भ्रांती, प्रमाद व अनर्थ आणि पृथ्वीतत्त्वामुळे अवकाश, अज्ञान, अविवेक, वंचन व मुर्च्छा या पंचवीस लक्षणांचा अनुभव विश्वातील सर्व मानवांना येत असतो.[९६] अर्थात, कारणदेहाचे हे गुण असलेले सर्व मानव क्षत्रियदेखील असतात.

श्रीरामानंदांनी, आपला कारण देह हाच क्षत्रिय आहे, हे पुढीलप्रमाणे जाणून घेण्यास सांगितले आहे. ते म्हणतात,

**'कारण देह तोचि क्षत्रिय जाण। तेथे दुजियाचे नाही भान।**
**एकान्त नांदे आपण । धरी खूण मानसीं।।'**[९७]

क्षत्रिय शक्तिमान असतो. तो इतरांची तमा बाळगीत नसतो. इतरांचे त्याला भानही नसते. क्षत्रिय स्वभावत: बलवान असल्याने तो अन्यसहाय्यनिरपेक्ष-शूर असतो. म्हणजे, इतरांच्या सहाय्यावर त्याचे शूरपण अवलंबून नसते. म्हणूनच तो सिंहाप्रमाणे एकटा वा एकान्तात राहू शकतो, रहात असतो. सुषुप्ती ही कारण देहाची अवस्था आहे. अज्ञानात्मक कारण देहालादेखील इतरांचे भान नसते. गाढ झोपेत जसे आपल्याला इतरांचे भान नसते तसा क्षत्रिय इतरांविषयी निरपेक्ष असतो. स्वविषयक अज्ञानामुळे क्षात्रवृत्ती बळावते. उदाहरणार्थ, व्यक्तीच्या ठिकाणी आकाशतत्त्वामुळे क्षात्रवृत्तीला शोभणारा मद, वायुतत्त्वामुळे अप्राप्य गोष्ट मिळविण्याची वांछा, तेजतत्त्वामुळे धनद्रव्यादि मिळविण्याची इच्छा, जलतत्त्वामुळे करुणा आणि पृथ्वीतत्त्वामुळे अविवेकजन्य धाडस इत्यादि लक्षणे निर्माण होतात. हे श्रीदिनकरस्वामीकृत कारण-देहाच्या स्वरूपाचे विवरण समजून घेताना 'कारण-देहाचे क्षत्रियत्व' सुस्पष्ट होते.[९८]

थोडक्यात, उपरोक्त मद, वांच्छा, इच्छा, करुणा व धाडस ही लक्षणे असलेल्या आपल्या कारण-देहाने आपण सर्व मानव क्षत्रियदेखील असतो.

**आपला महाकारण देह हा आपला ब्राह्मण वर्ण होय-**

महाकारण हा आपल्या पिंडातील चौथा देह होय. मी स्थूलादि तिन्ही देहांहून वेगळा म्हणजे ब्रह्मस्वरूप

**सर्व देवांचा देव आत्मा! आत्मा हा प्रत्येकाच्या हृदयात निवास करतो व तो ध्यानाने प्राप्त होतो.**

आहे, असे जे सानुभव स्मरण ते महाकारण देहाचे स्वरूप होय. महाकारण देहाची तुर्या ही अवस्था होय. श्रीसद्गुरूकृपेने तुर्यावस्थेत शिष्याला ज्ञानदृष्टी लाभली की गीतेत म्हटल्याप्रमाणे, जीवरूपी मी अज, अदाह्य, अक्लेद्य, अशोष्य, असंग, अच्छेद्य, ज्योतिर्मय, अमर आहे, असा अनुभव येतो.[१९]

ब्रह्मज्ञानी ब्राह्मणास जसे क्षत्रिय, वैश्य व शूद्र या तीनही वर्णांचे ज्ञान असते त्याप्रमाणे तुर्यावस्थेत ज्ञात होणाऱ्या आपल्या महाकारण देहाला (म्हणजे आपल्या महाकारण देहाचे ज्ञान झालेल्या साधकाला) आपल्या स्थूल, सूक्ष्म व कारण या तीनही देहांचे ज्ञान असते. या तीन देहांच्या अनुक्रमे जागृती, स्वप्न व सुषुप्ती या तीन अवस्थांच्या नंतरच्या ज्ञानरूपिणी तुर्यावस्थेत जिला आपल्या चौथ्या महाकारण देहाचे ज्ञान होते ती व्यक्ती ब्राह्मण वर्णाची होते, ती वेदादिशास्त्र, काव्य, व्याकरण, ज्योतिष व शुद्ध ब्रह्मज्ञानात निपुण होते. म्हणून, आपला महाकारण देह हा आपला ब्राह्मण वर्ण असतो व या चौथ्या देहाचे ज्ञान (झालेले) असते तो विश्वातील कुणीही मानव ब्राह्मण वर्णाचा ( होत वा झालेला) असतो.[२०]

श्रीदिनकरस्वामी यांनी स्पष्ट केल्याप्रमाणे, महाकारण देहाचे ज्ञान होणे म्हणजे आत्मारूपी आपण पूर्ण, अज, अदाह्य, अक्लेद्य, अशोष्य, असंग, अच्छेद्य, व्यापक, प्रकाशरूप, पावनस्वरूप, निर्मळ, क्षमावंत, अमोल आहोत असे सानुभव जाणणे होय. आत्मज्ञानाने म्हणजे 'अहं ब्रह्म अस्मि' या ज्ञानाने व्यक्ती महाकारणदेहस्वरूप होते तेव्हा ब्राह्मण होते. आत्मज्ञान तुर्यावस्थेत प्राप्त होते म्हणून ज्यांना तुर्यावस्था प्राप्त झालेली असते फक्त तेच मानव ब्राह्मण असतात आणि ज्यांना तुर्यावस्था प्राप्त झालेली नसते ते ब्राह्मणेतर मानव असतात.

प्रत्येक मानवात चारही वर्ण असतात वा असू शकतात, या विधानाचे पुढील आणखी दोन प्रकारे स्पष्टीकरण दिले जाऊ शकते -

**१) चार विकासावस्था म्हणजे मानवाचे चार वर्ण होत -**

प्रत्येक मानवात चारही वर्ण असतात वा असू शकतात, या विधानाचे पुढील आणखी दोन प्रकारे स्पष्टीकरण दिले जाऊ शकते-

मानव-विकासाच्या चार अवस्था याच प्रत्येक मानवाचे चार वर्ण असल्याचे वर्णिले गेले आहे. शैशवावस्था, बाल्यावस्था व किशोरावस्था संपेपर्यंत व्यक्ती शूद्र असते. (जन्मतः प्रत्येक व्यक्ती शूद्र असते, या अर्थाचे वेदवचनही आहे.[२१]) शूद्रावस्थेनंतर वयाच्या ४०व्या वर्षापर्यंत वैश्य, त्यानंतर ६०व्या वर्षापर्यंत क्षत्रिय आणि ६०व्या वर्षानंतर ती ब्राह्मण असते.[२२]

बाल्य, तारुण्य, प्रौढावस्था व वृद्धावस्था या चार अवस्था (कालखंड) म्हणजे अनुक्रमे ब्रह्मचर्य, गृहस्थ, वानप्रस्थ व संन्यास हे चार आश्रम होत. यावरून, वर्ण व आश्रम या समानार्थी संकल्पना आहेत, असे सूचित होते.

शैशवावस्थेत, बाल्यावस्थेत व किशोरावस्थेत व्यक्ती आज्ञाधारक, नम्र व सेवाभावी असते, तिचा अद्याप विकास व्हावयाचा असतो, ही शूद्र लक्षणे होत. या शूद्रावस्थेनंतरच्या ४०व्या वर्षापर्यंतचा काळ धनार्जनात, विविध प्रकारच्या शारीरिक मानसिक उपभोगांत तसेच गृहस्थाच्या जबाबदाऱ्या पार पाडण्यात व्यतीत होतो. व्यापार-उद्योग करणाऱ्या वैश्याप्रमाणे गृहस्थाश्रमी व्यक्ती व्यग्र, उद्योगरत वा व्यस्त असते म्हणजे वैश्य असते. यानंतरच्या क्षत्रियावस्थेत म्हणजे वयाच्या ६०व्या वर्षापर्यंत व्यक्तीच्या जबाबदाऱ्या व शक्ती यांचा व्यापक विकास होत असतो. ती स्वत:च्यापेक्षा व घरच्यांच्यापेक्षा सामाजिक व राजकीय कारभाराकडे आकृष्ट होते. राज्यकारभारात लक्ष घालणे, त्यात सहभागी होणे, देशसेवा करणे, कुटुंबाबरोबरच समाजाच्या सुरक्षिततेची वा सुव्यवस्थेची काळजी वाहणे, यांत ती रममाण होते. म्हणून या अवस्थेतील व्यक्ती क्षत्रिय असते. ६०व्या वर्षानंतर मानवाची वृद्धावस्था म्हणजे ब्राह्मणावस्था सुरू होते. वृद्धावस्थेत भौतिक संपत्तीचे आणि शारीरिक-मानसिक उपभोगांविषयीचे आकर्षण कमी झालेले असते. अनेक वर्षांच्या अनुभवसमृद्धीमुळे

सल्ला देणे, मार्गदर्शन करणे, जीवनावर भाष्य करणे यासारखी कामे व्यक्ती कळतनकळतपणे करू लागते. वृद्धावस्थेतील शूद्रही पूज्य असतो, असे मनुनेही म्हटले आहे. अनुभवसंपन्नता हे त्यामागील कारण होय.[२३]

व्यक्तिविकासाचे टप्पे व त्यानुसार प्रगट होत जाणारी लक्षणे यावर आधारलेले हे वर्णविश्लेषण विश्वातील सर्व मानवांना लागू पडते म्हणून सर्व मानव चारही वर्णांचे असतात वा असू शकतात, हे विधान वास्तवदर्शी व स्वीकारार्ह ठरते.

**२) विश्वातील प्रत्येक माणूस चौवर्णी असतो-**

मानवी शरीराचे चार भाग कल्पून तेच चार वर्ण असल्याचे विश्लेषणही केले गेले आहे. मानवाच्या मुखकमलामध्ये डोळे, कान, नाक, जीभ, त्वचा ही ज्ञानेंद्रिये एकत्रित आली आहेत. पाय, पोट व छाती या भागांच्या तुलनेत मुखाचे ठिकाणी अधिक ज्ञानसाधने आहेत. ज्ञानसाधनांच्या आधिक्यामुळे आपले मुख हे आपला ब्राह्मण वर्ण होय. शरीराचे संरक्षण बाहुबलामुळे व हृदयातील रक्ताभिसरणामुळे शक्य होते म्हणून बाहु व छाती ही दोन्ही क्षत्रिय होत. जन्मापासून मरेपर्यंत खाऊनही जे भरत नाही ते आपले पोट म्हणजे आपला वैश्य वर्ण होय आणि या तिन्ही भागांचा भार सहन करणारे, त्यांना वाहून नेणारे म्हणजे त्यांची सेवा करणारे पाय हे शूद्र होत.

एका ब्रह्मनिष्ठ व श्रोत्रिय प्रवचनकाराने[२४] केलेले चार वर्णांचे हे स्पष्टीकरण सर्व मानवांना लागू पडते व त्यावरून विश्वातील प्रत्येक माणूस चौवर्णी असल्याचे स्पष्ट होते.

* * * * *

**संदर्भ व टिपा :**

(१) गीता, ३.१३; (२) भारतीय संस्कृतीचा पाया, पृष्ठ क्र. १९३; (३) 'हित आहे देहातीत । म्हणोनि निरुपिती संत। देहबुद्धिने अनहित । होऊंचि लागे।।.. म्हणोन देहबुद्धि झडे । तरीच परमार्थ घडे । देहबुद्धिने बिघडे । ऐक्यता ब्रह्मींची।।' - दासबोध, ७.२.३७ व ३९ ; (४) दीपरत्नाकर, १२.१९४ ; (५) तत्रैव, १३.५४; (६) तत्रैव, १३.१३४; (७) तत्रैव, १३.११२; (८) दीपरत्नाकर, १३.११३-११९; (९) स्वानुभवदिनकर,११.२.१-१०; (१०) ज्ञानेश्वरी, १८.८८३; (११) दीपरत्नाकर, १३.११०; (१२) स्वानुभवदिनकर, ११.२.६४-७२; (१३) दीपरत्नाकर, १३.११९-१२३; (१४) श्रीबहिणाबाई अभंग : मना तूं व्यापकापरीस ; (१५) श्रीएकनाथी भागवत, ६.२; (१६) स्वानुभवदिनकर, ११.२.१०७; ११.३.२३-२६ व ११.४.१२; (१७) दीपरत्नाकर, १३.१२४; (१८) स्वानुभवदिनकर, ११.३.४-२३; (१९) गीता,२.२३-२४ व स्वानुभवदिनकर,११.४.३२-३५; (२०) दीपरत्नाकर, १३.१२५-१२८; (२१) 'जन्मना: जायते शूद्र: संस्कारात् द्विज उच्यते ।' या संस्कृत वचनाचे अर्थ गूगल-सर्च मध्ये विशद केले भेले आहेत.; (२२) हिंदु रिलीजन अँड मॉरॅलिटी, पृष्ठे क्र. ९८ ते १००; (२३) स्वधर्मविचार, पृष्ठे क्र. ११५-११६; (२४) परामर्श, नोव्हेंबर १९१९, पृष्ठ क्र.२०.

* * * * * *

**डॉ. विजय बाणकर,**
मु. कोल्हेवाडी,
पो. खडकवासला (आर. एस.)
पुणे : ४११०२४
(९३२५५८८०५)

***

सर्व देवांचा देव आत्मा! आत्मा हा प्रत्येकाच्या हृदयात निवास करतो व तो ध्यानाने प्राप्त होतो.

## हरिपाठाच्या गाभाऱ्यात : संत एकनाथ (भाग ७)



संत एकनाथांच्या हरिपाठात आत्मज्ञान सहजपणे सांगितलेले आहे. ते शोधण्यासाठी चिंतन-मनन-वाचन आवश्यक आहे. ते म्हणतात, जे कळत नाही ते समजणे आणि जे समजते ते न कळणे, तसेच जे वळते ते न कळणे याचे ज्ञान गुरुशिवाय आकलन होत नाही. सगुणाची पूजा केली तरी ती निर्गुणाची पूजा होते. याविषयी ज्याच्या मनी संशय निर्माण होईल, त्याची जिव्हा झडेल. बहुरुप्याने संन्याशाचा वेश धारण

केलेला पाहून लोक त्याला धन देतात. ते संन्याशाला नव्हे, तर बहुरुप्याला दिले म्हणतात. तसेच सगुणाला पूजले, तरी ते निर्गुणाला पूजल्यासारखे होते. हा सगुण-निर्गुणाचा खेळ म्हणजेच अद्वैत-द्वैताचा खेळ आहे. तो खेळ जगात सर्वत्र दिसतो. तो नामधारकच ओळखतात.

**-नामदेव सदावर्ते**

संत ज्ञानेश्वर महाराजांच्या 'हरिपाठा' प्रमाणेच संत एकनाथ महाराजांचा हरिपाठ वारकरी संप्रदायात लोकप्रिय आहे. निष्ठावंत वारकऱ्यांच्या नित्यपठणात ज्ञानदेव, एकनाथ, नामदेव, तुकाराम, निवृत्तीनाथ या पाच संतांचा हरिपाठ असतो. संत ज्ञानराजांनंतर सुमारे २५० वर्षांनंतर संत एकनाथ महाराज जन्माला आले. त्यांना संत ज्ञानदेवांचा अवतार मानतात. श्रीमद्भागवताच्या अकराव्या अध्यायावर मराठी भाषेतून संत एकनाथांनी केलेली ओवीबद्ध रचना 'एकनाथी भागवत' वारकरी संप्रदायात लोकप्रिय आहे. एकनाथी भागवत हा ग्रंथ एकतीस अध्यायांचा असून, त्यात १८ हजार ७९८ ओव्या आहेत. ज्ञानेश्वरी व एकनाथी भागवतात एकाच आत्मज्ञानावर सविस्तर प्रतिपादन आहे. ज्ञानेश्वरीतील सिद्धांत एकनाथी भागवतात अधिक विस्ताराने, स्पष्ट सांगितले आहे. सामान्य भाविकांना कर्मकांडमुक्त करण्यासाठी सर्व संतांनी आपले विचार अभंगातून प्रकट केले. ज्ञानराजांच्या हरिपाठातील आत्मज्ञान अधिक सविस्तर व लोकभाषेत सांगणारा एकनाथांचा हरिपाठ पंचवीस अभंगांचा असून, प्रत्येक अभंगात पाच-पाच चरण आहेत. संत एकनाथ महाराज हरिपाठातील पहिल्या अभंगात सांगतात-

**हरिचिया दासा हरि दाही दिशा।**
**भावे जैसा तैसा हरि एक।।**

श्रीहरीच्या भक्ताला आपला भगवंत श्रीहरी दाही दिशांमध्ये भरलेला दिसतो. भक्ताच्या समदृष्टीमुळे कोणतीही दिशा अशुभ किंवा नकारात्मक विचारांनी भारलेली नसते. जसा भाव तसा देव. मुखाने श्रीहरी नामोच्चार सुरू असेल, तर त्या भक्तास कशाचीही चिंता नसते. भाविकांच्या शुद्ध अंतःकरणातून होणाऱ्या अखंड नामस्मरणाने भक्तच हरिरूप होतो. त्याच्या वासना इच्छाही हरिरूप होतात. मी-तू पणाचे द्वैत हरीच्या ठायी एकरूप होतात, म्हणून हरीचे स्वरूप ध्यानी मनी ठसवून शुद्ध अंतःकरणाने हरीभजन करावे.

**सुखी तेणे व्हावे जगा निववावे।**
**अज्ञानी लावावे सन्मार्गीसी।।**

मुखाने हरीहरी बोलावे. उगीच काहीतरी बडबड न करता अबोल असावे. व्यर्थ गलबला करून आवाजांचे प्रदूषण करू नये. मान-अभिमान या गोष्टी मनी न बाळगता मी-तू पणाचा जो त्याग करील, तोच सुखी होईल. सुखी झाल्याने जगाला शांत करावे. अज्ञानी असलेल्या जनसामान्यांना सन्मार्गाला लावावे.

**सर्व देवांचा देव आत्मा! आत्मा हा प्रत्येकाच्या हृदयात निवास करतो व तो ध्यानाने प्राप्त होतो.**

भक्तिपूर्वक श्रद्धेने नामस्मरण करण्याचा मार्ग ज्याला सापडला, तो व्यवहारी जगात रमत नाही. नामस्मरणाने हरिरूप सर्वत्र दिसते. नाथ महाराज म्हणतात-

**ओळखिला हरि धन्य तो संसारी।**
**मोक्ष त्याचे घरी सिद्धीसहित ।।**

सर्वत्र दिसणारा श्रीहरी जो ओळखतो तो या संसारातील अत्यंत भाग्यवान आहे. अशा गृहस्थाच्या घरी आनंद, सिद्धी, मोक्ष प्राप्त होतो. पण तो हरीभक्तपरायण त्या मोक्षसिद्धीत रममाण होत नाही. कारण श्रीहरीस्मरणाच्या आनंदापुढे हे गौण आहे. राजहंस दूध-पाणी वेगळे करू शकतो. पण तो राजहंस पाणी पित नाही. फक्त दूधच पितो. तसेच केवळ ज्ञानमार्गाने श्रीहरीचे सगुण रूप प्राप्त होते. संशयाने नाही. श्रीहरीसंगतीने सुखाची विश्रांती प्राप्त होते. जसे कर्म केले, तसे फळ-भोग प्राप्त होतात. कर्म आणि भोग यात अडकून कितीतरी आहे आणि गेले.

**जे जे दृष्टी दिसे तें तें हरिरूप।**
**पूजा ध्यान जप त्यासी नाही।।**

जिकडे पहावे तिकडे हरीरूपच दिसू लागले म्हणजे मग त्यासाठी निराळी पूजा, ध्यान, जप काहीही करण्याची गरज नाही. वैकुंठ, कैलास या तीर्थक्षेत्रात देव आहेच. पण तो सर्व ठिकाणी असून, त्याच्याशिवाय रिकामी अशी जागा या विश्वात कोठेही नाही. सर्व जीवसृष्टीत ईश्वर सामावलेला आहे, अखंड नामस्मरणाने जीव-शिव एक रूप होतात.

**नामाविण मुख सर्पाचे तें बीळ।**
**जिव्हा नव्हे काळसर्प आहे।।**

हरिनामाचा उच्चार न करणारे ते मुख सर्पाचे बीळ होय. तसेच त्याच्या तोंडातील ती जीभ काळसर्प होय. अशा भक्तिहीनाचे जगणे व्यर्थ आहे. यमनगरीत यातना भोगणाऱ्या अशा माणसाला हरीवाचून दुसरा कोण सोडविल? पुत्र, बंधू, कांता हे सारे संपत्तीचे लोभी असतात. अंतःकाळाचा सोबती कोणीही नाही. संतसंगतीने हरिप्राप्ती होते. हरी ही दोन अक्षरे कोट्यवधी कुळांचा उद्धार करतात.

पूर्वपुण्याईचे फळ म्हणून जी माता धन्य झाली तरी ते फळ हरिनामोच्चारावाचून निष्फळ होते. वेदांताचे बीज असलेले हरी हे अक्षर एक सोपे व पवित्र साधन आहे. योगयाग, व्रते, नेम-धर्म, दान-कर्मकांड उपासना ही सर्व साधने हरिनाम जपापुढे अनावश्यक आहेत. संसारात राहूनही नामधारक मुक्त असतो व तोच ब्रह्मज्ञानी असतो.

**राव रंक हो कां उच नीच याती।**
**भक्तिवीण माती मुखी त्याच्या।।**

अनंत जन्मीच्या पुण्याईमुळे नरदेह प्राप्त झाला तरी भक्तीवाचून तो जन्म अधोगतीस जातो. पापकर्म कसे नाहिसे होईल आणि भाग्य कसे उदयास येईल, हे मानवास कळत नाही. अनंत जन्माचे

पुण्य पदरी असेल तरच 'हरिनाम' मुखी येईल. राजा असो अथवा रंक असो, उच्चवर्णीय असो की नीच जातीचा असो, भक्तिशिवाय त्याचे जीवन व्यर्थ आहे. हरिनामाचा जो अखंड जप करतो, तो धन्य होय.

**भक्तिवीण पशू कशासी वाढला।**
**सटवीने नेला कैसा नाही।।**

हरिनामामृताचे सेवन करणाऱ्या भाविकास मोक्षही तुच्छ वाटतो. ज्याच्या घरामध्ये नेहमी हरिनामाचा गजर होत असतो. ते घर काशीपुरीसारखे तीर्थक्षेत्र मानावे. भक्तिशिवाय जो मनुष्य तो पशूच मानावा. तो उगाचच वयाने वाढला. त्याला बाळपणीच सटवीने का नेले नाही, हा भक्तिहीन कशाला जिवंत ठेवला? त्याची आई भुताजवळ गेली होती का? त्याचमुळे त्याच्या मुखी हरिनामाचा उच्चार होत नाही. त्याने केलेल्या

**सर्व देवांचा देव आत्मा! आत्मा हा प्रत्येकाच्या हृदयात निवास करतो व तो ध्यानाने प्राप्त होतो.**

पापाविषयी यमाने विचारणा केली असता त्याला काय उत्तर देणार? यमयातना भोगाव्याच लागतील. नाथ महाराज म्हणतात-

**एका जनार्दनी सांगता हे तोंडे।**
**अहा वाचा रडे बोलताची।।**

आपल्या हितासाठी भक्तिभावाने संतसंगत धरली असता श्रीहरीची भेट होईल. ज्या ठिकाणी हरी, तेथे संत आणि जेथे संत तेथे हरी, असे चारही वेद सांगतात. ज्ञानसंपन्न ब्रह्मदेवालाही वेदाचा अर्थ समजला नाही. तेथे आपल्यासारख्यांना तो कसा कळेल? वेदांची बीजाक्षरे श्रीहरी हा जप करावा. श्रीहरी सच्चिदानंदाचेच प्रतिरूप आहे. नाथ सांगतात-

**सत्यद ते ब्रह्म, चित्पद ते माया।**
**आनंदपदी जया म्हणती हरि।।**

जे सत्यपद तेच ब्रह्म व चित्पद तेच माया, या दोन्हींचे जे तिसरे पद आनंद, त्यालाच श्रीहरी म्हणतात. सत्पद निर्गुण व चित्पद सगुण. निर्गुण-सगुण ही दोन्ही श्रीहरीची आनंदरुपे आहेत. सगुण-निर्गुणाच्याही पलीकडे आहे, ते परब्रह्म आणि तेच सत्य आहे. नम्र भाविकांना हरिपदाची प्राप्ती होते आणि अभिमानी, गर्विष्ठांना नरकवास मिळतो. आस्ति, भाति आणि प्रियता हे हरीरूप आहे. जे आहे ते दिसते व ते प्रिय होते. त्या तीनही अवस्था म्हणजेच 'सच्चिदानंद'! तोच हरी नामस्मरणानेच आकळतो.

संत एकनाथांच्या हरिपाठात आत्मज्ञान सहजपणे सांगितलेले आहे. ते शोधण्यासाठी चिंतन-मनन-वाचन आवश्यक आहे. ते म्हणतात, जे कळत नाही ते समजणे आणि जे समजते ते न कळणे, तसेच जे वळते ते न कळणे याचे ज्ञान गुरुशिवाय आकलन होत नाही. सगुणाची पूजा केली तरी ती निर्गुणाची पूजा होते. याविषयी ज्याच्या मनी संशय निर्माण होईल, त्याची जिव्हा झडेल. बहुरुप्याने संन्याशाचा वेश धारण केलेला पाहून लोक त्याला धन देतात. ते संन्याशाला नव्हे, तर बहुरुप्याला दिले म्हणतात. तसेच सगुणाला पूजले, तरी ते निर्गुणाला पुजल्यासारखे होते. हा सगुण-निर्गुणाचा खेळ म्हणजेच अद्वैत-द्वैताचा खेळ आहे. तो खेळ जगात सर्वत्र दिसतो. तो नामधारकच ओळखतात.

**ओळखिला हरि धन्य साठविला पोटी।**
**होता त्याची भेटी दुःख कैचे।।**

जो नित्यनेमाने मुखाने हरिनाम गातो त्याचे कूळ पवित्र आणि त्याची माता धन्य होय. ज्याच्या मनात काम, क्रोध आणि लोभ आहेत, तो या नामाचा अधिकारी नाही. श्रीहरीला हृदयात साठविला असेल तर संसारातील दुःखे नष्ट होतील. नामस्मरण हे वैष्णवाचे गुप्तधन आहे. नाथ महाराजांच्या हरिपाठातील काही अभंग अत्यंत सोपे आहेत. त्यापैकी हा एक सोपा अभंग-

**हरि बोला देतां हरि बोला घेतां।**
**हसता खेळतां हरि बोला।।१।।**
**हरि बोला गातां हरि बोला खाता।**
**सर्व कार्य करितां हरि बोला।।२।।**
**हरि बोला एकांती हरि बोला लोकांती।**
**देह त्यागा अंती हरि बोला।।३।।**
**हरि बोला भांडतां हरि बोला कांडतां।**
**उठता बसता हरि बोला।।४।।**
**हरि बोला जनी हरि बोला विजनी।**
**एका जनार्दनी हरि बोला।।५।।**

कोणी हे जग-संसार एक तत्त्वाचा (माया-ब्रह्म), कोणी तीन तत्त्वांचा (सत्व-रज-तम), कोणी पाच तत्त्वांचा (पंचमहाभूते), तर कोणी पंचवीस तत्त्वांचा मानतात. पण या सर्व तत्त्वांचे मूळ श्रीहरीच आहे. अविद्येमुळे जीवाची उत्पत्ती झाली आहे, असे मानतात. आणि मायेच्या उपाधीला शिव म्हणतात. पण जीव आणि शिव हे दोन्ही श्रीहरिरूपाचेच तरंगप्रकार आहेत. तरंगप्रकाराचा समुद्र जो हरी, तो अभंग आहे. शिंपल्यावरील चमक चांदीसारखी दिसणे, दोरीला साप मानणे, हे मायेमुळे घडते. जे हरीनामधारक ज्ञानी आहेत, ते क्षेत्र जीव व क्षेत्रज्ञ शिवपरमात्मा यांना जाणतात. त्यासाठी हरीभजन करावे.

कल्पनेप्रमाणे जो ठेवा कल्पितो, त्यायोगे भ्रम निर्माण होऊन श्रीहरीचा मात्र विसर पडतो. दिल्यावाचून फलप्राप्ती कशी होईल? म्हणून कल्पनेची इच्छा व्यर्थ आहे. श्रीहरी चरणांच्या प्राप्तीची इच्छा केल्यानेच तो ईश्वर तुला सर्वकाही देईल. कल्पना आणि अभिमान यांची गाठ कोटी जन्म घेतले तरी सुटणार नाही. संत एकनाथ महाराज म्हणतात, कल्पना आणि अभिमानच आमचा हरिरूप झाला आहे. ही खूणगाठ गला सापडली आहे.

**एका जनार्दनी सापडली खूण।**
**कल्पना अभिमान हरी झाला।।**

दुष्टांच्या सहवासाने फायदा न होता नुकसानच होते. हे सर्व जाणून वैष्णव-सज्जनांनी कुपथ्याचा, दुर्जन संगतीचा त्याग केला, तर फारच चांगले होणार!

**वैष्णवी कुपथ्य टाकिले वाळूनी।**
**एका जनार्दनी तेचि भले।।**

उत्कृष्ट लक्षणांनी युक्त अशा सुंदर स्त्रीचा लाभ जर नपुंसकाला झाला, तर त्याला काय उपयोग? आंधळ्यापुढे दिवा ठेवणे किंवा गाढवाला चंदनाची उटी लावून आंघोळ घालणे किंवा सर्पाला दूध पाजणे या गोष्टी व्यर्थ होय. रागीट आणि अविश्वासी माणसाला ज्ञानबोध करणे काय उपयोगाचे? त्यासाठी आपली वाणी व्यर्थ का श्रमवावी?

**न जायचि ताठा नित्य खटाटोप।**
**मंडुकी वटवट तैसे ते गा।।**

आपल्या अंगचा गर्वाहंकारी ताठा न घालविता सतत संसारातील खटाटोप करणारे व तोंडाने हरीहरी म्हणणारे सारे डबक्यातील बेडकाप्रमाणे ओरडणारे जाणावेत. भक्ती प्रेमावाचून भजन करणे, नाकाशिवाय मोती घालणे किंवा अर्थ जाणल्याशिवाय केवळ पोथी-ग्रंथ वाचणे हे सर्व व्यर्थ आहे. जसे कुंकवाचा ठावठिकाणा नसताना मी 'सौभाग्यवती' असे म्हणणे व्यर्थ आहे. तसे भाव असल्याशिवाय 'देवा पाव' म्हणणे व्यर्थच होय. पश्चातापाशिवाय मन शुद्ध होत नाही. अनुतापावाचून भाव निर्माण होत नाही. हे अनुभवाने शोधावे.

**प्रेमाविण भजन नाकाविण मोती।**
**अर्थाविण पोथी वाचुनि काय।।**

भगवंताविषयी प्रेम, भाव-भक्ती नसेल तर केवळ नामस्मरणजप करून ईश्वराचे खरे स्वरूप व आत्मज्ञान होणार नाही. त्याचप्रमाणे आपण ज्या पोथीचे, ग्रंथाचे वाचन-पारायणे करतो, त्यातील ओव्यांचा अर्थ व भावार्थ जर समजून घेतला नाही, त्याचे चिंतन-मनन केले नाही, तर केवळ वाचन-पारायण करून आत्मज्ञानसंपन्नतेतून मिळणारे अनुभव-सुख मिळणार नाही. जसे चौदाशे वर्षांचे चांगदेव, ज्ञानराजांचे पासष्ट ओव्यांचे पत्र वाचून ज्ञानबोध मिळवू शकले नाहीत. गुरुपदेशानंतर त्यांना पासष्टीचे अर्थ-ज्ञान मिळाले. म्हणून संत नामदेव ज्ञानेश्वरीचे वाचन व पारायण करणाऱ्या भोळ्या भाविकांना सांगतात- एक तरी ओवी अनुभवावी' म्हणून भाविकांनी ज्ञानेश्वरीरूपी मंदिराला केवळ बाहेरून प्रदक्षिणा मारीत बसण्यापेक्षा

सर्व देवांचा देव आत्मा! आत्मा हा प्रत्येकाच्या हृदयात निवास करतो व तो ध्यानाने प्राप्त होतो.

ज्ञानेश्वरीचे आस्वादपूर्वक अर्थज्ञान मिळवून भगवंताच्या गाभाऱ्यात प्रवेश करून अमृतानुभव मिळवावा.

ज्ञानराजांच्या हरिपाठाप्रमाणे एकनाथांचा हरिपाठ ही आत्मज्ञानाचे प्रतिपादन करतो. नाथ महाराज एका अंभंगात म्हणतात-

**बारा-सोळा जणी हरिसी नेणती।**
**म्हणोनि फिरती रात्रंदिवस।।**
**सहस्त्र मुखांचा वर्णितां भागला।**
**हर्ष जया झाला तेणे सुखे।।**

हे जीवांनो, इतर कर्माचे साधन न करता हरिप्राप्तीसाठी साधन करा. ज्यामुळे यमयातना नाहीशा होतील आणि जन्ममरणाचे फेरेही चुकतील. सर्व साधनांचे सार बीजमंत्र म्हणजे श्रीहरी. मनात संशय न घेता हरिनामजपाचा निश्चय करा. म्हणजे तुम्हाला हरिरूप प्राप्त होईल.

बारा सूर्य आणि चंद्राच्या सोळा कला हरीला जाणत नाहीत, म्हणून ते दोघे रात्रंदिवस फिरत असतात. हजार मुखांचा शेषनाग तोही श्रीहरीचे गुणवर्णन करता करता थकला, परंतु तोही सुखी झाला. चार वेदही त्याला न जाणता मौन झाले, असे जे गुह्यज्ञान तुला कसे प्राप्त होईल? पूर्वपुण्याई व सद्‌गुरुकृपा असेल तर नामस्मरण- जपाने तो श्रीहरी जाणता येईल.

**आवडीने भावे हरिनाम घेसी।**
**तुझी चिंता त्यासी सर्व आहे।।**
**नको खेद करू कोणत्या गोष्टींचा।**
**पती तो लक्ष्मीचा जाणतसे।।**

आवडीने, श्रद्धेने जर हे हरिनाम तू घेशील, तर तो हरीच तुझ्या सर्व चिंता दूर करील. तू कोणत्याही गोष्टीचे दुःख करू नको, तो लक्ष्मीपती भगवंत सर्व जाणतो. तोच सर्व जीवाचा सांभाळ करतो. तो श्रीहरी तुला अव्हेरील काय? नशीबातील भोगाचा श्रीहरीकृपेने नाश होतो. प्रेमाने नामस्मरण जप-ध्यान करीत त्या देवाचे कौतुक पाहा.

**दुर्बळाची कन्या समर्थाने केली।**
**अवदसा निमाली दारिद्याची।।**

नाथमहाराज सांगतात, श्रीमंताने गरीबाची मुलगी पत्नी म्हणून स्वीकारल्यावर तिचे दारिद्र्य नाहिसे होते व तीही श्रीमंत होते. तशी श्रीहरीची कृपा झाल्यावर ते हरीभक्त तृप्त होतात व आनंदाने नाचतात. देव आणि भक्त एकरूप होतात. कापूराच्या वातीची ज्योत पेटविल्यावर कापूर आणि ज्योतीत भेद उरत नाही. त्याप्रमाणे ज्याची वासनाच हरीरूप झाली, तो परब्रह्मस्वरूप होतो.

श्रीहरीचे रूप विश्वात सर्वत्र व्यापून राहिले आहे. कर्मयोग, उपासना आणि ज्ञानमार्ग हे तीनही मार्ग हरिपाठात सामावलेले आहेत. जो सतत श्रद्धेने हरिपाठ गातो, त्याच्यावर श्रीहरिची कृपादृष्टी असतेच. नाथ म्हणतात- नित्य प्रेमभावे हरिपाठ गाय।

**हरिकृपा होईल तयावरी।।**
**झाला हरिपाठ बोलणे येथूनी।**
**एका जनार्दनी हरि बोला।।**
**संत एकनाथ महाराजांना वंदन!**

**-नामदेव सदावर्ते**
पसायदान बंगला, मानकर मळा,
मखमलाबाद, नाशिक

***



## अकोल्यातील दत्तोपासकांची परंपरा

अहमदनगर शहर-जिल्हा आणि अकोले तालुक्यातील श्रीगुरुदेवदत्त उपासनेची थोर परंपरा वेधक-लक्षणीय आहे. अनेक संत-महंत, दत्तोपासक, विद्वज्जनांनी दत्त साधनेच्या, उपासनेच्या तसेच संशोधकीय परंपरेत तोलामोलाचे योगदान दिलेले आहे. अनेक साधूसंतांच्या, महान तपस्वी सत्पुरुषांच्या संबंधित गावातील आगमनाचे, जन्मविषयक तसेच घराण्यातील तपशील बऱ्याचदा अनुपलब्ध अथवा गूढगम्य असतात. अहमदनगर जिल्ह्यातील पश्चिमेकडील डोंगररांगांनी व्याप्त अकोले तालुक्यातील ऋषीमुनी, साधू-संतांचा आध्यात्मिक वारसा उज्ज्वल आहे, संपन्न आहे. रामायणकालीन महर्षी अगस्त्य यांच्यापासून तर अगदी चंडिरामबोवा, दत्तवरद विठ्ठल, यशवंत बाबा, कोंडाजी बाबा, बालयोगी ओतूरकर-नारायणानंद यांच्यापर्यंतची महती, परंपरा बहुश्रुत आहे.

**-डॉ. सुनील शिंदे**

अहमदनगर शहर-जिल्हा आणि अकोले तालुक्यातील श्रीगुरुदेवदत्त उपासनेची थोर परंपरा वेधक-लक्षणीय आहे. अनेक संत-महंत, दत्तोपासक, विद्वज्जनांनी दत्त साधनेच्या, उपासनेच्या तसेच संशोधकीय परंपरेत तोलामोलाचे योगदान दिलेले आहे. अनेक साधूसंतांच्या, महान तपस्वी सत्पुरुषांच्या संबंधित गावातील आगमनाचे, जन्मविषयक तसेच घराण्यातील तपशील बऱ्याचदा अनुपलब्ध अथवा गूढगम्य असतात. अहमदनगर जिल्ह्यातील पश्चिमेकडील डोंगररांगांनी व्याप्त अकोले तालुक्यातील ऋषीमुनी, साधू-संतांचा आध्यात्मिक वारसा उज्ज्वल आहे, संपन्न आहे. रामायणकालीन महर्षी अगस्त्य यांच्यापासून तर अगदी चंडिरामबोवा, दत्तवरद विठ्ठल, यशवंत बाबा, कोंडाजी बाबा, बालयोगी ओतूरकर-नारायणानंद यांच्यापर्यंतची महती, परंपरा बहुश्रुत आहे.

अकोले (जिल्हा-अहमदनगर) येथील सुमारे २६० ते २७० वर्षांपूर्वी होऊन गेलेले प्रतिभावंत श्री गुरुदेवदत्त भाविक संतकवी अवधूत वरद अर्थात् दत्तवरद विठ्ठल हे तोलामोलाचे महान संत. दत्तात्रेय हे उपास्य दैवत असलेले दत्तवरद विठ्ठल हे यजुर्वेदी कात्यायनी ब्राह्मण. संस्कृत श्लोकांसह अनेक स्तोत्रांचे लेखन आणि सुमारे ६६ हजार ओव्यांची विपुल काव्यरचना दत्तवरद यांनी केली. काव्यगुणांनी अलंकृत अशा स्वरूपाचे हे लेखन आहे. वृत्त-अलंकारिकता यांनी परिपूर्ण अशी ही प्रासादिक वाणी थक्क करणारी आहे.

संतकवी महिपतीबुवा ताहराबादकर, तसेच कवी श्रीधर यांच्या तोडीचे हे तुलनात्मक लेखन असल्याचा गौरवपूर्ण निर्देश अभ्यासक-संशोधक करतात. दत्तवरद, अवधूतवरद, विठ्ठल कवी या नावांनी या रचनांची निर्मिती झाली आहे. अकोले येथील मधली गल्ली या नावाने परिचित भागात (जुन्या पोस्ट ऑफिसजवळील कै. डॉ. वि. ह. जुगादे यांच्या निवासस्थानाजवळ) असलेले दत्त मंदिर दत्तवरद यांनी स्थापल्याची माहिती मिळते.

या मंदिरात लक्ष्मी-नारायणाच्या आकर्षक मूर्ती आणि गरुडमूर्तीसह मूळ दत्तात्रेयांची धातूची उभी

**सर्व देवांचा देव आत्मा! आत्मा हा प्रत्येकाच्या हृदयात निवास करतो व तो ध्यानाने प्राप्त होतो.**

मूर्ती पाहायला मिळते. त्रिशूल, शंख, गदा कमंडलू हाती असलेली ही मूर्ती आहे. देवालय प्राचीन असल्याने पडझडीचा धोका विचारात घेऊन ट्रस्ट स्थापन करून येथे नवीन बांधकाम सुरू होणार असल्याचे समजते. धातूच्या मूळ मूर्तीशिवाय आता नवीन दत्तमूर्तीदेखील स्थापन केली गेली आहे. लक्ष्मी-नारायण मूर्तीसमोर एकमुखी दत्तमूर्तीही दिसते.

दत्तवरद विठ्ठल यांनी केलेल्या विपुल लेखनावर अधिक संशोधन होणे नितांत जरुरीचे आहे. दरवर्षी दत्त जयंती उत्सव सोहळ्यात गुरुचरित्र पारायण उत्साहाने साजरे होते. याच दत्त मंदिरात दत्तवरदांची हस्तलिखिते सापडली होती. १९६५ साली पुणे-जयकर ग्रंथालयात (सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ) हस्तलिखित काव्यग्रंथांचा प्रवेश झाला. 'दत्तवरद विठ्ठल विरचित महाभारत : वाङ्मयीन आणि ऐतिहासिक मूल्य' या विषयावरही विद्यापीठ स्तरावर संशोधन झाले असल्याची नोंद मिळते.

विख्यात दत्त भाविक, महान दत्तोपासक निरंजन रघुनाथ (शके १७०४-१७७७) यांना अकोले गावी श्री गुरुदत्तांचा झालेला साक्षात्कार याबाबतचा संदर्भ हाती आला आहे. अकोले येथील कमान वेस भागात रहिवासलेले संस्कृतज्ञ, सत्प्रवृत्त चंडिरामबोवा महाराज यांच्याकडे निरंजन रघुनाथ काही काळ थांबले होते.

अकोले येथील कमान वेस भागात चंडिरामबोवा यांच्या घराण्याची जागा आजही आहे. काही काळ कमान वेशीतील मुरलीधर मंदिरातही चंडिराम राहत होते. दत्तोपासक निरंजन रघुनाथ अकोलेत चंडिराम यांच्याकडे कसे आले तो इतिहास रोचक आहे. अवधूत हे निरंजन रघुनाथांचे मूळ नाव. निरंजन यांचा जन्म कळंबचा. (कार्तिक शु. ८, शके १७०४). दत्तनामाचे चिंतन, स्मरण करीत तीन दिवस अन्नपाण्याशिवाय काट्याकुट्यांतून-डोंगरदऱ्यांतून घोडनगरी, जुन्नर, ब्राह्मणवाडा, कोतूळमार्गे निरंजन अकोले येथे आले. चंडिराम यांचेकडे राहिले. तेथे एकादशस्कंधावर पुराण ऐकताना दत्तगुरु दर्शनाची त्यांची ओढ वाढली.

अकोले मुक्कामी असतानाच कार्तिक शु. ९, शके १७३३ या दिवशी सगुण ध्यान साधना-भक्ती सफल होऊन निरंजन यांना श्री गुरुदत्तात्रेयांचा स्वप्न साक्षात्कार झाला. याप्रसंगीचे वर्णन ते पुढीलप्रमाणे करतात-

**'हृदयांतरी करितो ध्यान।**
**हें देहीं गेलो विसरून।**
**तेथिंचा आनंद पाहून।**
**वृत्ती शून्य पैं झाली।**
**ऐसे एक घटिकापर्यंत।**
**वाट पाहतो स्वप्नात।**
**जे कां रचना मूर्तिमंत।**
**मनोमय योजिली।**
**ऐसे पाहतां तेचिं वेळी।**
**कर्मरेषा विचित्र बळी।**
**दत्तात्रेय मूर्ती हृदयकमळी।**
**मातें जाली बोलती।**
**तेथें मनाची मूर्ती सान।**

**तें श्रीगुरुंनी ह्रदयीं आलिंगून।**
**मुखासि लावूनि माझा कान।**
**मंत्र झाले बोलती।।**

निरंजन रघुनाथ यांच्या दत्त साक्षात्काराची घटना अकोले ग्रामी कमान वेस गल्लीत चंडिराम बोवांच्या निवासस्थानीची. पुढे यथावकाश निरंजन अकोले येथून निघून सिन्नर, देवपूरमार्गे नाशिककडे रवाना झाले. वरील अभंग आणि काही संक्षिप्त माहिती विख्यात संशोधक, संत साहित्याचे ज्येष्ठ अभ्यासक साहित्यिक डॉ. रा. चिं. ढेरे यांच्या 'दत्त संप्रदायाचा इतिहास' या ग्रंथात ससंदर्भ उपलब्ध आहे. अगस्त्य भाविक, प्रेस फोटोग्राफर आणि अगस्ती देवस्थान ट्रस्टचे भूतपूर्व विश्वस्त दिवंगत विरुपाक्ष उर्फ बबन जंगम यांच्या 'अगस्ती महर्षि' ग्रंथातही काही संदर्भ उपलब्ध झाला.

अकोले येथेच चंडिराम यांचा अखेरपर्यंत निवास होण्याचे अथवा समाधी होणे अकोल्याच्या भाग्यात नव्हते दुर्दैवाने! त्यामागील चंडिराम यांच्याविषयीची उपलब्ध माहितीही संघर्षमय आहे. त्यांचा जन्म अकोल्याचाच. (शके १६९४). ते थोर अगस्त्य भाविक-उपासक होते. त्यांचे संस्कृतवर प्रभुत्व होते. सहस्त्रभोजन नियोजन-उपक्रमाबाबत त्यांची ख्याती सर्वदूर पोचली होती. मात्र खुद्द अकोले येथील निवासी पुरोहितांना सहस्त्रभोजन देण्याच्या त्यांच्या उपक्रमावर येथील पुरोहितांनी बहिष्कार टाकला आणि संघर्ष वाढला. संताप व्यक्त करून चंडिरामबोवा अकोले गाव सोडून थेट भटकंती करीत पुणे जिल्ह्यातील खेड (राजगुरूनगर) येथे पोहचले आणि स्थिरावले! पौष कृष्ण चतुर्दशी, इसवीसन १८५१ साली हा संस्कृत पंडित-महान अगस्त्य भक्त समाधिस्थ झाला. अकोले नगरीत जन्मलेला आणि अगस्त्य आश्रम, प्रवरामाईच्या अंगाखांद्यावर-अंगणात वाढला-वावरलेला हा सत्पुरुष अखेर खेडच्या भीमातीरावर समाधिस्थ झाला! आजही दरवर्षी पौष चतुर्दशीला चंडिराम यांची पुण्यतिथी खेड येथे साजरी केली जाते. तेथील श्रीविष्णू मंदिरात गरूड मंडपासमोर चंडिराम बोवांची समाधी आहे.

अकोले, कमानवेस परिसरात सुधीर जोशी या शिक्षकांनी त्यांच्या निवासासमोर असलेल्या चंडिराम यांच्या घराण्यातील उपलब्ध जागेत शेडवजा जागा आरक्षित ठेवल्याची माहिती दस्तलेखक त्यांचे बंधू अनिल जोशी यांनी सांगितले. अकोले येथील पुरोहित मंडळाने, पुरोहित सभेने या ठिकाणी स्मृती जतन करण्याबाबत प्रयत्न करणे आवश्यक असल्याचे जाणकार सांगतात. दत्तवरद, निरंजन रघुनाथ आणि चंडिरामबोवा या महान दत्त उपासकांची थोर परंपरा प्रेरणादायी-संस्मरणीय आहे.

**- डॉ. सुनील शिंदे**
'दत्त सुकृत', व्हेलेंसिया रेसेडेन्सी
बी विंग, फ्लॅट नं. १०४, पहिला मजला,
अगस्ती साखर कारखाना रोड
अकोले : ४२२ ६०१, जि. अहमदनगर
(मो. ९४२३०४५३४२)

***



## घडो त्याचा समागम

अनुताप याचा अर्थ ढोबळ मानाने पश्चाताप असा आहे. येथे निळोबाराय अनुतापासी दुणीव चढे म्हणतात. म्हणून अनुताप याचा अर्थ ढोबळमानाने घेऊ नये. ताप म्हणजे त्रास असाही अर्थ आहे. जेव्हा विठ्ठली प्रेम निर्माण होते, तेव्हा ते प्राप्त करताना येणारे अडथळे यावर लक्ष केंद्रित होते. अडथळे हे काही नैसर्गिक नसतात, तर आपणच यापूर्वी केलेल्या चुका वा कृती हे अडथळे निर्माण करीत असतात. अडथळे दूर करण्यासाठी मनुष्य मग ते अडथळे निर्माण करणारे विचार वा प्रसंग यांच्या मुळाशी जाण्यासाठी त्याबाबत चिंतन करतो व जेव्हा त्याला त्याच्या अनैतिक चुका वा कृती कळू लागतात, तेव्हा तो त्याबाबत पश्चात्ताप करतो. अध्यात्मात चूक वा अनैतिक कृत्याला पश्चात्तापाशिवाय मोठी शिक्षा नाही.

**- बंडोपंत कुलकर्णी**

**घडो त्याचा समागम।**
**ज्यांचे प्रेम विठ्ठली।।१।।**
**सहज त्याच्या ऐकतां गोष्टी।**
**परमार्थ पोटी दृढावे।।२।।**
**अनुतापासी दुणीव चढे।**
**वैराग्य वाढे चढाओढी।।३।।**
**निळा म्हणे वाढे भाव।**
**संचरे स्वानुभव निजांगी।।४।।**

हा अभंग पूर्ण अद्वैताकडे नेणाऱ्या मार्गाशी योग निर्माण करणारा आहे. आगम तो परब्रह्म परमेश्वर होय. कारण सर्वप्रथम तोच आहे व आगमनानेच नव्हे, तर त्याच्याच कृपेने हे ब्रह्मांड घडले. आगम व निगम हे द्वैतमार्गे भक्ती व अद्वैतमार्गे मोक्ष दर्शवितात. ज्याला आकार नाही, त्याला ओळखणे वा अनुभवण्यासाठी आकाराचीच मदत घ्यावे लागते. आगम हा परमात्मा निराकार पण त्याला ओळखण्यासाठी साकार देहाची मदत व सहाय्य आवश्यक असते. जसे पाणी निराकार असते, पण त्याला भांड्याचा उपयोग करून आकारात आणावे लागते. त्याप्रमाणे द्वैत भक्ती आहे. निगम हे वेद, उपनिषदे वगैरे. जे अद्वैत वर्णन करून फक्त ज्ञानमार्गे ईश्वर अनुभूती देतात. द्वैतभक्तीमार्गे अद्वैताकडे जावे लागते. जेव्हा आपण विठ्ठल होऊ, तेव्हाच आपले मिलन वा भेट ही त्या आगमाशी होईल. म्हणजेच अद्वैत अनुभवता येईल. अद्वैत अवस्था हीच विठ्ठल अवस्था होय. आपण विठ्ठल केव्हा होऊ, तर जेव्हा त्या विठ्ठलावर आपण प्रेम करू व त्याच्याशी एकरूप होऊ. आता प्रश्न येतो आपण विठ्ठल कसे व्हावे? विठ्ठल म्हणजे एका अर्थाने ध्यान अवस्था आहे. विठ्ठल म्हणजे स्थिरता होय. ती स्थिरता म्हणजे देहभान विसरून फक्त आत्म-परमात्मा यांचे मीलन म्हणजे अद्वैत अनुभवयाचे व मिळणारी अनुभूती ही सच्चिदानंद असेल. अद्वैत अवस्था हीच विठ्ठल अवस्था होय.

**बोलावा विठ्ठल, पाहावा विठ्ठल।**

सर्व देवांचा देव आत्मा! आत्मा हा प्रत्येकाच्या हृदयात निवास करतो व तो ध्यानाने प्राप्त होतो.

**करावा विठ्ठल, सर्वभावे।।**

यातील करावा विठ्ठल हा तोच आहे. जेव्हा ध्यान धारणेत प्रेम निर्माण होईल, तेव्हाच तर मनुष्य हा स्थिर होण्याचा प्रयत्न करेल. जेव्हा एखाद्या गोष्टीचा वा व्यक्तीचा संपर्क येईल व त्याच्याशी गप्पागोष्टी होतील, तेव्हा त्या गोष्टीचे गुण वा व्यक्तीचा स्वभाव माहीत होणार. जेव्हा ते गुण वा तो स्वभाव आपणाला आवडतील, तर ती गोष्ट वा त्या व्यक्तीचा सहवास हवाहवासा वाटेल व आपण तो मिळविण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करतो. गुण व स्वभाव एकसारखे असणाऱ्या गोष्टी तात्काळ जवळ येतात. पण प्रेम निर्माण होण्यासाठी प्रथम ती गोष्ट वा त्या व्यक्तीचा संपर्क सतत असणे आवश्यक आहे. आपण जेव्हा नियमित विठ्ठल होण्याचा ध्यास घेऊ, त्यावेळी आपण सतत त्याबाबतच चिंतन करणे आवश्यक आहे. उठता, बसता, निजता वा चिंतिता त्यावेळी फक्त त्या विठ्ठलाबाबतचा विचार मन-चित्तात हवा. बोलावा विठ्ठल, पाहावा विठ्ठल। यात तुकोबाराय तेच सांगतात. मग निळोबाराय याच कारणांमुळे म्हणतात -

**सहज त्याच्या ऐकतां गोष्टी।**
**परमार्थ पोटी दृढावे।।**

अनुताप याचा अर्थ ढोबळ मानाने पश्चाताप असा आहे. येथे निळोबाराय अनुतापासी दुणीव चढे म्हणतात. म्हणून अनुताप याचा अर्थ ढोबळमानाने घेऊ नये. ताप म्हणजे त्रास असाही अर्थ आहे. जेव्हा विठ्ठली प्रेम निर्माण होते, तेव्हा ते प्राप्त करताना येणारे अडथळे यावर लक्ष केंद्रित होते. अडथळे हे काही नैसर्गिक नसतात, तर आपणच यापूर्वी केलेल्या चुका वा कृती हे अडथळे निर्माण करीत असतात. अडथळे दूर करण्यासाठी मनुष्य मग ते अडथळे निर्माण करणारे विचार वा प्रसंग यांच्या मुळाशी जाण्यासाठी त्याबाबत चिंतन करतो व जेव्हा त्याला त्याच्या अनैतिक चुका वा कृती कळू लागतात, तेव्हा तो त्याबाबत पश्चात्ताप करतो. अध्यात्मात चूक वा अनैतिक कृत्याला पश्चात्तापाशिवाय मोठी शिक्षा नाही. जेव्हा आठवून आठवून पश्चात्ताप केला जातो, तेव्हा पुन्हा तशी कृती घडणार नाही याची तो काळजी घेतो. कोणतीही अनैतिक कृती ही फक्त काम, क्रोध, मोह, लोभ, मत्सर व अहंकार यामुळेच घडते. जेव्हा पश्चात्ताप होतो, तेव्हा ती केलेली कृती अनावश्यक होती, हे उमजते व त्यापासून दूर जाण्यास सुरुवात होते. मग यातून सहज पाठोपाठ त्यापासून विरक्ती व त्यानंतर वैराग्य निर्माण होते. म्हणून निळोबाराय म्हणतात-

**अनुतापासी दुणीव चढे। वैराग्य वाढे चढाओढी।।**

विठ्ठल होऊन वैराग्य प्राप्त झाल्यावर मग तेथे फक्त आणि फक्त आत्मा व परमात्मा हेच शिल्लक राहतात. मग या देहाला कळून चुकते की जरी या देहामुळे सर्वकाही प्राप्त होत असले तरी प्राप्तीनंतर हा देहाला शून्यदेखील किंमत नाही. हाच तो स्वानुभव होय. यात निजांगी शब्द वापरला आहे. निजांगी म्हणजे परमात्म्याने ज्याक्षणी देह दिला, त्याक्षणी असलेली देहावस्था होय. कारण देह प्रदान केला, त्यावेळी या देहात लालसा वा लालच वा षड्रिपू हे सक्रिय नव्हते. पण दृश्याच्या स्वाधीन होऊन हव्यासापोटी त्यांना सक्रिय केले जाते व तेव्हा बिघाड निर्माण होतो. विरक्ती व वैराग्य प्राप्तीनंतर या देहाला कशाची हौस व कौतुक नसते व देह हा निजांग अवस्थेत जातो. तेव्हा देह आत्म्याचे अनुकरण करण्यास प्रारंभ करतो व हा देह स्वतःला संसारातून काढून परमार्थात लावतो. म्हणून निळोबाराय म्हणतात,

**निळा म्हणे वाढे भाव। संचरे स्वानुभव निजांगी।।**

**- बंडोपंत कुलकर्णी,**
जिल्हा न्यायाधीश, सोलापूर

***

सर्व देवांचा देव आत्मा! आत्मा हा प्रत्येकाच्या हृदयात निवास करतो व तो ध्यानाने प्राप्त होतो.



## त्रिमूर्ती अवतार श्रीगुरु दत्तात्रय

गुरुदेव दत्तात्रय यांचे सृष्टीचे निर्माण, पालनपोषण, रक्षण, संहार व पुनर्निर्मितीचे जगद्कार्य अखंड चालू आहे. दत्तात्रेयांनी संपूर्ण भारतभर भ्रमण केले व लोकांमध्ये ईश्वरभक्तीचा प्रसार केला. अखिल सृष्टीच्या हिताकारणे विश्वात्मक सृजन कार्य त्यांनी केले. मानवास प्राप्त विवेकबुद्धीद्वारे त्यास भक्तीचे ज्ञान देऊन त्यास ईश्वराची जाणीव करुन देतात. भक्तांच्या अडी-अडचणी व दुःखांचे निवारण करतात. श्रद्धा-भक्तियुक्त अंतःकरणाने स्मरण केल्यास भक्ताच्या हाकेला तात्काळ धावून येतात. म्हणून श्रीदत्तांना स्मर्तृगामी म्हणतात. गुरुदेव दत्त तिन्ही लोकांचे परम दैवत आहेत.

**- बी. के. गायकवाड**

मार्गशीर्ष पौर्णिमेला सर्वत्र श्री गुरुदेव दत्तजयंती महोत्सव साजरा होतो. कोकमठाण आश्रमातही आत्मा मालिक ध्यान योग मिशनद्वारे प. पू. सद्‌गुरू, संत व भाविकांच्या उपस्थितीत सदानंद महाराज अर्थात हनुमंतराव भोंगळे यांच्या निवासस्थानी दत्तजयंती साजरी होते. यावेळी गुरुचरित्र पारायण, दत्तयाग महापूजा होते.

ईश्वराकडून निर्मित अपौरुषीय वेद, श्रुती, तसेच व्यासऋषी लिखीत ग्रंथ, पुराणे, उपनिषदे, भागवत कथा श्रीमद्‌भगवद्‌गीतेसह महाभारत या सर्वांमधून जिज्ञासू ज्ञानी लोकांना आध्यात्मिक ज्ञानासह सृष्टी विज्ञानाचे यथार्थ दर्शन घडते.

ईश्वर परमात्मा स्वयंभू एकच आहे. परमात्म्याचे संकल्पातून एका स्वरूपातून अनेक देवी-देवता, दैवी प्रकृती मायेतून पंचमहाभूतात्मक अनेक ब्रह्मांडांची रचना झाली. ब्रह्मा सृष्टीनिर्माता, विष्णू पालनपोषणकर्ता आणि महेश संहार आणि पुनर्निर्मिती या सृष्टीकार्यासाठी तिन्ही देव अवतरीत झाले व त्यांच्या अर्धांगिनी स्वरुपात सरस्वती, लक्ष्मी व महाशक्ती स्वरुपिनी पार्वती प्रगट झाल्या.

ब्रह्मदेवाचे मानसपुत्र अत्री ऋषी व त्यांची पतिव्रता भार्या अनसूया यांचे भूलोकी वाढत्या सेवा महात्म्यामुळे तिन्ही देव्यांच्या मनात असूया निर्माण झाली. तिघींनी आपले पती म्हणजेच ब्रह्मा, विष्णू, महेश यांना विनवणी करुन अनसूयेच्या प्रतिव्रता सेवेत कमीपणा आणण्यासाठी पाठविले. आश्रमात आल्यावर त्रिदेवांनी अनसूयेकडे केलेल्या भिक्षा याचना पूर्ततेसाठी पतिव्रता अनसूयाने योगमायेने तिन्ही देवांना लहान बालकांत रुपांतरीत केले. त्यावेळी अनुष्ठानास गेलेले अत्री ऋषी आश्रमात आल्यावर त्यांनी अंतर्ज्ञानाने आलेले अतिथी हे त्रिमूर्ती प्रत्यक्ष ब्रह्मा, विष्णू, महेश आहेत हे जाणले. देवांचे बालकात रुपांतर झाल्याची वार्ता तिन्ही देवींना महर्षी नारदाकडून समजली. त्यांनी अत्री ऋषींच्या आश्रमी येऊन क्षमायाचना केली. त्रिदेव मूळ स्वरुपात प्रगटले. अत्री ऋषी व अनसूया यांच्यावर प्रसन्न होऊन इच्छित वराने या त्रिदेवांनी विष्णू स्वरुपात एकत्र होवून 'श्री दत्तात्रय' अवतार धारण केला.

**गुरुर्ब्रह्मा गुरुर्विष्णु, गुरुर्देवो महेश्वरः।**
**गुरु साक्षात परब्रह्म, तस्मै श्री गुरुवे नमः।।**

गुरुदेव दत्तात्रय यांचे सृष्टीचे निर्माण, पालनपोषण, रक्षण, संहार व पुनर्निर्मितीचे जगद्कार्य अखंड चालू आहे. दत्तात्रेयांनी संपूर्ण भारतभर भ्रमण केले व लोकांमध्ये ईश्वरभक्तीचा प्रसार केला. अखिल सृष्टीच्या हिताकारणे विश्वात्मक सृजन कार्य त्यांनी केले. मानवास प्राप्त विवेकबुद्धीद्वारे त्यास भक्तीचे ज्ञान

देऊन त्यास ईश्वराची जाणीव करुन देतात. भक्तांच्या अडी-अडचणी व दुःखांचे निवारण करतात. श्रद्धा-भक्तियुक्त अंतःकरणाने स्मरण केल्यास भक्ताच्या हाकेला तात्काळ धावून येतात. म्हणून श्रीदत्तांना स्मर्तृगामी म्हणतात. गुरुदेव दत्त तिन्ही लोकांचे परम दैवत आहेत.

गुरुदेवांचा महिमा अपरंपार आहे. तो अगम्य आहे. चारी वेदसुद्धा गुरुंचा महिमा पूर्ण वर्णू न शकल्याने 'नेती, नेती' म्हणून स्तब्ध झाले. श्री गुरुचरित्रातील 'गुरुगीता' या अध्यायात महादेव व पार्वती यांचा आत्मसंवाद दिला आहे. त्यांना महादेव सांगतात, श्रीगुरुंची श्रद्धापूर्वक अनन्यभावे भक्ती करणाऱ्या भक्ताचे योगक्षेम श्रीगुरू वाहतात. त्यास सायुज्य मुक्ती प्राप्त होते. भक्ताचे आत्मकल्याण होऊन आत्मोद्धार होतो. गुरुकृपेने भक्ताला सर्वकाही मिळते व मोक्षप्राप्ती होते. गुरुंना अनन्यभावे शरण जावे. श्रीगुरुंच्या चरणांचे स्मरण करून श्रद्धेने नित्य मानसपूजा करावी. भक्ताला इह-परलोकीचे सौख्य प्राप्त होते.

गुरुदेवांनी आपल्या सगुण अवतारात मानवास ज्ञानार्जन होण्यासाठी स्वतः सृष्टीतील वेगवेगळे २४ गुरू करून त्या प्रत्येकापासून काही चांगला गुण अनुसरला व तो जनमानसांत प्रकटला, जसे की मधमाशी अविरत फुलातून मध गोळा करून त्याचा संचय करते. परंतु, हा मध दुसराच येऊन घेऊन जातो, तेव्हा संचयवृत्ती नको. मासे धरणारा माणूस त्याच्या कार्यात इतका मग्न होतो की त्याला इतर कशाचे भान असत नाही. मनाची एकाग्रता, संस्कार शिकवण यात येते.

श्रीगुरु संसाररुपी भवसागरातून तरुन जाण्यासाठी भक्ताला ज्ञान देऊन मार्ग दाखवतात व त्याची जीवननौका सुखरूप पैलतिरी पोहचवतात. निष्ठापूर्वक श्रीगुरुंची भक्ती करणाऱ्या भक्तांची संचित कर्मबंधनातून मुक्तता करून त्याची संकटे निवारण केल्याची अनेक उदाहरणे गुरुचरित्र कथेतून दिली आहेत. त्यामध्ये सायंदेव नामक एका भक्ताला यवन राजापासून मृत्यूभय संकटातून सोडवून जीवनाचे रक्षण केले व पुढे त्यास आपला अनुयायी केले. दत्तभक्ती करणाऱ्या घराण्यातील एक स्त्रीचा पती असाध्य आजाराने ग्रस्त असता अकाली निधन पावला. दत्त आपल्या स्थानाकडे श्री क्षेत्र गाणगापुरी येत असताना त्या स्त्रीला दर्शन देऊन तिला सती जाण्यापासून परावृत्त करून आशीर्वाद देऊन तिच्या पतीस पुनर्जीवित करून जीवनदान देतात.

एक सेवेकरी परीट भक्ताला त्याच्या मनीषा जाणून जन्मांतरी राज्यपदी विराजमान केले. तर, एक असाधारण व्याधीमुळे त्रस्त असलेल्या परंतु ईश्वरभक्ती करणाऱ्या भक्तास औदुंबर वृक्षाचे शुष्क काष्ट देऊन ते संगमी लावून त्यास पाणी घालण्यास सांगितले. त्यानुसार नित्य पाणी घालताना त्याच्या संचित कर्माचे परिहरण करून वृक्षास पालवी फुटताच त्याला व्याधीपासून मुक्त केले व त्याला आपला भक्त करून घेतले. अशा प्रकारे अनेक भक्तांची संकटे निवारून भक्तिमार्गातून जीवाचा उद्धार केला आहे.

औदुंबर वृक्षातळी श्रीदत्तगुरुंचा नित्य वास असतो. म्हणून औदुंबरास प्रदक्षिणा घालून 'दिगंबरा दिगंबरा, श्रीपाद वल्लभ दिगंबरा' असा नाममंत्र म्हणण्यात येतो. त्याने भक्ताचे दैन्यदुःख निवारण होऊन त्यास ऐश्वर्यप्राप्ती होते.

**'गुरु हरिहर, विरंची जाणा। स्वरुपे तोचि नारायण।**
**मन करुनी निर्वाण सेवा करावी भक्तीने।।'**
**चंद्रदर्शने ताप जाती। गंगा दर्शने पापे जाती।**
**श्री गुरुदर्शने पाप, ताप दैन्य जाती।।**

श्री दत्तभक्तास प्रकृती-माया-मोह या बंधनातून मुक्त करून त्याची गुरुभक्तीतून आध्यात्मिक, आत्मिक उन्नती होण्यास सहाय्य होते. ईश्वराचे, परमात्म्याचे आत्मतत्व जे निरंतर अविनाशी आहे व आत्मत्त्वाचा आविष्कार म्हणजे ही चैतन्ययुक्त सचेतन सृष्टी आहे. श्रीगुरुंचे दत्ततत्व व ईश्वर आत्मतत्त्व हे एकच आहे. आत्मा परमसत्य आहे. आत्मा निर्गुण आहे. आत्मा सर्वांठायी हृदयमंदिरी आहे. आत्मा हाच ईश्वरस्वरूप आहे. त्या आत्म्यावर प्रेम करावे. एकच परमेश्वर अनंत रुपांनी सर्वांभूती वसलेला आहे. म्हणून

संत सांगतात, जे जे भेटे भूत, ते ते जाणिजे भगवंत.

मनुष्यास आपल्या आयुष्यात संतसंगतीद्वारे श्रद्धापूर्वक शुद्ध अंतःकरणाने केलेल्या भक्तीने श्री सद्‌गुरू भेटतात. सद्‌गुरू हे प्रत्यक्ष ब्रह्मस्वरूप आहेत, ते मुमुक्षु जीवाचे अज्ञान दूर करून त्याला ज्ञान देतात. श्री दत्तात्रय प्रेमस्वरूप आहेत. आपल्या भक्तांचे ईश्वरभक्तीतून रक्षण करतात. जीवनात नित्य सत्त्वगुणांनी युक्त, सात्विक कर्माचरण करुन ती सत्कर्मे त्याची फलाशा न ठेवता व कर्तेपणाचा अहंकार न बाळगता ती ईश्वरचरणी समर्पित करावीत, हीच शिकवण देऊन अशा निष्काम कर्माचरणाद्वारे भक्ताला कर्माच्या सुख-दुःखाच्या बंधनातून मुक्त ठेवून जीवनमुक्त म्हणजेच मोक्षप्राप्ती करुन देतात. दत्तगुरुंची अनन्य श्रद्धेने भक्ती करणाऱ्या भक्ताचे सर्व योगक्षेम वाहून त्याला सायुज्य मुक्ती मिळते.

सृष्टीच्या सृजन कार्यासाठी व भक्तांच्या रक्षणार्थ दत्तगुरुंचे अनेक अवतार झाले. आंध्र प्रदेशातील पिठापूरम या धार्मिक स्थळी इ. स. १३०० च्या दरम्यान 'श्रीपाद श्रीवल्लभ' गुरुंचा अवतार झाला. त्यांनी श्रीक्षेत्र 'पिठापूरम' येथे आपल्या माता-पित्याच्या घरी १६ वर्षे, तर श्रीक्षेत्र कुरवपूर येथे १४ वर्षे राहून दत्तभक्ताचे रक्षण करून आपले अलौकीक कार्यातून ईश्वर भक्तीचा संदेश, समस्त मानवहित कल्याण कार्यासाठी दिला. भक्तांचे अज्ञान दूर करून त्याच्या आत्मोन्नतीसाठी ज्ञान दिले. श्रीगुरू ब्रह्मस्वरूप असून, ते कालातीत आहे. त्यांना जाणे-येणे नाही. तरी श्रीपाद वल्लभ यांनी साधारण ३० वर्षांच्या आपल्या अवतारकार्यात सत्संगातून ईश्वरभक्तीने लोकांचे प्रबोधन केले. त्यांच्या अडीअडचींी, दुःखांचे निवारण केले. त्यांच्या मंगल आणि कल्याणकारी कार्याची अनेकांना अनुभूती झाली.

भक्तास दिलेल्या वचनाच्या पूर्तीसाठी पुढील अवतार महाराष्ट्रातील 'कारंजा' गावी 'नृसिंह सरस्वती' म्हणून धारण केला. वयाच्या सात वषापर्यंत केवळ 'ॐ' उच्चार करीत मुंजबंधानंतर सातव्या वर्षी चारी वेद मुखोद्‌गत वदविले. उपस्थित ब्राह्मणवृंदांसह सर्वांनी आश्चर्य व्यक्त केले.

पुढे मातापित्यांच्या अनुमतीने काशीनगरी जाऊन संन्यास घेतला. समस्त जगाच्या कल्याणाचे कार्य केले. महाराष्ट्रातील औदुंबर, कोल्हापूर, नृसिंहवाडी, गाणगापूर (कर्नाटक ), भीमा अमरजा नदीसंगमी निवास करून भक्तांचे दैन्य-दुःख दूर करून समस्त लोकांना ईश्वरभक्तीचे ज्ञान दिले व पुढे अवतार पूर्ततेकाळी कमळाच्या पानावर आरुढ होवून नदीतून पैलतीरी गेले व साधारण ३०० वर्षे समाधीत राहून प्रज्ञापुरी (सध्याचे अक्कलकोट) येथे श्री अक्कलकोट स्वामी समर्थ म्हणून प्रकटले. स्वामी समर्थांनी आपल्या ईश्वरी कार्यातून समर्थपणे भक्तिमार्गातून अनेक जीवांचे कल्याण केले.

दत्तगुरुंचे चरित्र अगम्य असून ते आकलन होणे सामान्य जीवास शक्य नाही. अनन्य भक्ताला त्यांच्या कृपेची अनुभूती येते. संतचरणी अनन्यभावे लीन झालेल्या भक्ताला सद्‌गुरुकृपेने आत्मानुभूती मिळते व शाश्वत आनंदाची प्राप्ती होते. दत्तगुरुंचा अनुग्रह नवनाथांतील मच्छिंद्रनाथ, गोरक्षनाथ, गहिनीनाथ व इतर नवनाथांना झाला. या नवनाथांनी दत्तभक्तीतून ईश्वरी कार्ये संपादित केली व सामान्य जीवाचा उद्धार केला.

संत ज्ञानेश्वरांचे ज्येष्ठ बंधू निवृत्तीनाथ यांनाही गहिनीनाथांचा अनुग्रह व दीक्षा प्राप्त झाली होती. त्यांच्याच आज्ञेने संत ज्ञानेश्वर माऊलींनी श्रीमद्‌भगवद्‌गीता सर्वसामान्य लोकांना कळावी म्हणून मराठी प्राकृत भाषेतून 'ज्ञानेश्वरी' लिहून त्यातून संपूर्ण गीता तत्वज्ञान सांगितले. आत्मा मालिक.

**श्री गुरुचरणी समर्पित**

(संदर्भ : श्री गुरुचरित्र कथा ग्रंथ)

**- बी. के. गायकवाड**

प्लॉट क्र. ५, नवमहाराष्ट्र को. ऑप. हौसिंग सोसायटी,

पुणे-सातारा रोड, पुणे -९, मो. नं. : ९४०३०२६१६४

***

सर्व देवांचा देव आत्मा! आत्मा हा प्रत्येकाच्या हृदयात निवास करतो व तो ध्यानाने प्राप्त होतो.



## स्वाध्याय

**प्रत्येक विचारवान व्यक्ति को प्रतिदिन संकल्पपूर्वक सद्ग्रंथो का स्वाध्याय अवश्य करना चाहिए। स्वाध्याय करना बहुत आसान है। स्वाध्याय के लिए सबसे महत्वपूर्ण बात है समय निकालना। तो इसके लिए अध्यात्म सागर की सलाह है, कि हम जब सुबह नहा-धोकर ध्यानादि करते है, तो उसके बाद का समय स्वाध्याय के लिए निकाल सकते है। यदि हम ध्यानादि नहीं भी करते हों, तो कोई बात नहीं। क्योंकि; कुछ दिन स्वाध्याय करने के बाद हम स्वतः ध्यान करने लगेंगे।**

**- नीता एवं नरेश यादव**

**चित चितवन को गौर कर, करो आत्म का ध्यान।**
**फिर जीवन सज जाएगा, जाग्रत आत्म का ज्ञान।।**

शुद्धता की पराकाष्ठा ही आत्मा को सभी का मालिक बनाती है। जब आत्मा शरीर से अलग एक तत्त्व के रूप में रहती है तो वह सत्य से सराबोर पूर्ण ब्रह्माण्ड का सास्वत ज्ञान उसमें प्राकृतिक रूप से समाया रहता है और वह अपनी विकास अवस्था के अनुरूप सत्य की पूर्णता में ऐसा जन्म प्राप्त करने का प्रयास करती है, जिससे ना केवल वह अपने अवांछित कर्म बन्धनों को काट सके, बल्कि ऐसे व्यक्तियों के सानिध्य या आसपास जीवन निर्वहन का मौक़ा प्राप्त कर सके जिससे उसके आत्मिक विकास का प्रायोजन सफल हो सके.

परन्तु जन्म के बाद, जैसे जैसे हम अपनी सांसारिक यात्रा में शामिल होते है, तो चयनात्मक होता है की दिमाग़ से चल रहे है या आत्मा के मार्गदर्शन से अथवा मिला जुला, यही चयन हमारे जीवन को आधार देता है। पर सत्य यह है, कि वास्तव में हमारी अंतर आत्मा में इस ब्रह्मांड की संपूर्णता विद्यमान है और ज्ञान उसका एक हिस्सा। इस प्रकार समस्त ज्ञान हमारे अंदर विद्यमान होता है। केवल उसे जाग्रत करना होता है, इस के लिए अध्यात्म की तमाम विधियाँ शिव शंकर ने प्रतिपादित कर इस संसार को भेंट कीं, जो आज भिन्न भिन्न परम्पराओं में विद्यमान हैं। अध्यात्म को अपने अंदर स्थापित करने के लिये हमें इन्ही में से किसी एक को चुनना और अपनाना होता है और उसी प्रकट से हमारी आत्मा को विकास का अवसर प्रदान करना होता है जिससे वह अपने साथ लाए मानव जीवन लक्ष्य को पूर्ण कर सके।

इस प्रकार साधना की ज्योति जगाने के लिए स्वाध्याय एक बहुत आवश्यक साधन व प्रक्रिया है। स्वाध्याय का सीधा मतलब है-स्वयं का स्वयं के द्वारा अध्ययन, यह पहले तक पड़ने से शुरू होता है, फिर समयानुसार यह इस प्रकार से अर्जित होता है जैसे आत्मिक प्रक्रिया अर्थात् यह स्वयं ही स्वयं का स्वयं के द्वारा अध्ययन में जाग्रत हो जाता है। इस सब को बहुत ही सावधानी पूर्वक संभालना पड़ता है। यदि नहीं सम्भाला और भ्रमित हो गए तो परिस्थितियाँ विपरीत हो सकती है, जैसे कि भ्रमित हो जाने पर सामान्यतया हमारे साथ ऐसा भी ऐसा होता है, कि हम अपना अधिकांश समय दुसरे मनुष्यों तथा वस्तुओं का अध्ययन करने में निकाल देते है, परिणामस्वरूप हमारे पास स्वयं का अध्ययन करने के लिए समय ही नहीं बचता है। जब हम स्वयं को समय नहीं दे पाते हैं, तो आस-पास के वातावरण का रंग हमारे ऊपर चढने लगता है। जो हमें दिन-प्रतिदिन कुविचारों के कीचड़ से मैला करता रहता है। जैसेः यदि हम प्रतिदिन के अपने सभी साफ-सफाई के क्रियाकलापों को बंद कर दें, तो क्या हम स्वच्छ और स्वस्थ रह पाएंगे? कभी नहीं! यदि हमने घर

**सर्व देवांचा देव आत्मा! आत्मा हा प्रत्येकाच्या हृदयात निवास करतो व तो ध्यानाने प्राप्त होतो.**

में झाड़ू लगाना बंद कर दिया तो कुछ ही दिनों में सब जगह धुल और मिट्टी ही नजर आएगी। यदि हम एक दिन के लिए भी ना नहाये तो शरीर बदबू मारने लगता है। इसीलिए हम प्रतिदिन अपनी भौतिक साफ सफाई का ध्यान बखूबी रखते है। किन्तु क्या हम अपने मन या अंदर आते विचारों की भी साफ-सफाई का ऐसा ही खयाल रखते है? शायद नहीं! क्यों? शायदः इसलिए कि हमें उसकी गन्दगी दिखती नहीं। किन्तु यदि गहराई से विचार किया जाये तो काम, क्रोध, लोभ, मोह, अहंकार, ईर्ष्या, द्वेष, कपट, हिंसा, असत्य, अब्रह्मचर्य, ईश्वर में अश्रृद्धा और अविश्वास, भय आदि इसी वातावरण के कीचड़ की गन्दगी है, जो हमारे विचारों तथा संस्कारों को प्रदूषित करती रहती है। जब कोई ध्यान नहीं दिया जाता, तो यही कुविचार या इसके विपरीत अच्छाई, जो भी हो हमारे मन की गहराइयों में जमने लगते है, जिन्हें संस्कार कहा जाता है। स्वाध्याय में कभी प्रमाद नहीं करना चाहिए। स्वाध्याय मन की मलिनता को साफ करके आत्मा को परमात्मा के निकट बिठाने का सर्वोत्तम मार्ग है।

अतः प्रत्येक विचारवान व्यक्ति को प्रतिदिन संकल्पपूर्वक सद्ग्रंथो का स्वाध्याय अवश्य करना चाहिए। स्वाध्याय करना बहुत आसान है। स्वाध्याय के लिए सबसे महत्वपूर्ण बात है समय निकालना। तो इसके लिए अध्यात्म सागर की सलाह है, कि हम जब सुबह नहा-धोकर ध्यानादि करते है, तो उसके बाद का समय स्वाध्याय के लिए निकाल सकते है। यदि हम ध्यानादि नहीं भी करते हों, तो कोई बात नहीं। क्योंकि; कुछ दिन स्वाध्याय करने के बाद हम स्वतः ध्यान करने लगेंगे। यदि नहीं करते है,तो फिर हम अपनी सुविधा से कोई भी ऐसा समय निकाल सकते है; जब हम शांतचित्त हो, कोई काम का टेंशन ना हो। स्वाध्याय सुबह, दोपहर, शाम या रात को भी किया जा सकता है। सुबह स्वाध्याय हमेशा ध्यानपूर्वक और तन्मयता से करना है। थोड़ा किन्तु गहन चिंतन के साथ किया गया स्वाध्याय बहुत लाभकारी होता है। स्वाध्याय के लिए जो भी पुस्तक निर्धारित की जाये, उसे क्रमबद्ध रूप से पढ़े। स्वाध्याय के समय अपने पास एक पेन और डायरी अवश्य रखे तथा जो भी बात हमको उपयोगी लगे उसे नोट कर ले। एकाग्रतापूर्वक स्वाध्याय करने से सभी बाते हमको लम्बे समय तक याद रहने लगेगी। शाम का स्वाध्याय उत्तम है, दोपहर का मध्यम है तथा रात का स्वाध्याय सबसे श्रेष्ठ श्रेणी में आता है। स्वाध्याय के लिए समय की कोई सीमा नहीं है। हम यदि फ्री हो तो दिनभर कर सकते हैं, किन्तु दिनभर का याद रहेगा नहीं। सामान्यतया हर कोई दिनभर फ्री नहीं हो सकता अतः स्वाध्याय के लिए हम कमसे कम ३०-६० मिनट का समय अवश्य दें। यदि इतना समय ना मिल सके तो किसी धार्मिक पुस्तक का एक पृष्ठ प्रतिदिन पढने का नियम बना ले। एक समय के बाद यह अंदर जागृत होने लगेगा, फिर पड़ने की जरूरत खत्म हो जाएगी और अंदर की गहराइयों से शब्द और संबंधित ज्ञान प्रस्फुटित हो जाएगा, यही आत्मा के मार्गशील हो जाने का रास्ता है, जो आत्मा को अपने मूल लक्ष्य को प्राप्त करने में सहायक और पूर्ण सक्षमता प्रदान करेगा और यात्रा को अंतिम पड़ाव तक ले जाएगा. गुरु प्रेरणा से लिखने में आता है -

**तप होवे स्वाध्याय का, रखो देह का ध्यान।**
**जैसे सतगुरु मिल गए, दूर ना आत्मा ज्ञान।।**
**आत्मा मालिक।**

**- नीता एवम नरेश यादव,**
आत्मा मालिक परिवार, इंदौर

***

सर्व देवांचा देव आत्मा! आत्मा हा प्रत्येकाच्या हृदयात निवास करतो व तो ध्यानाने प्राप्त होतो.

॥ सबका मालिक आत्मा ॥

**प.पू.सद्गुरु आत्मा मालिक माऊलींच्या कृपाशिर्वादाने**
**व संत परिवाराच्या उपस्थितीत**

# आत्मा मालिक दत्त जयंती सोहळा

(मार्गशीर्ष चौदस पौर्णिमा)

**दि. १४ डिसेंबर २०२४**



॥ दिगंबरा दिगंबरा श्रीपाद वल्लभ दिगंबरा ॥






## कार्यक्रम रुपरेषा

- पहाटे ३.०० ते ३.३० – श्रीपादुका अभिषेक, ध्यान व ब्रम्हआरती.
- पहाटे ४.०० ते ५.०० – श्रीगुरुचरीत्र व अवतारलिला पारायण सांगता
- पहाटे ५:०० ते ८:०० – **श्रीदत्त याग (हवन विधी)**
- सकाळी ८:३० – मोफत आरोग्य शिबीराचे उद्घाटन
- सकाळी १०.०० ते १२.३० – **सत्संग, दत्त जन्म सोहळा व मध्यान्ह आरती**
- दुपारी १२.३० ते २.३० – महाप्रसाद
- दुपारी २:३० ते ४.०० – विश्रांती
- दुपारी ४:०० ते ५:०० – हरीपाठ
- सायंकाळी ५:०० ते ६:०० – मौन ध्यान व आरती
- सायं. ६.०० ते ७.०० – पालखी सोहळा (नगर प्रदक्षिणा)
- सांय. ७:०० ते ८.०० – भजन व संध्या आरती
- रात्री ८.०० – नामदान (गुरुमंत्र)
- रात्री ९.०० – जपानुष्ठान व रुपानुष्ठान सांगता

  तद्नंतर– शेजारती




**ठिकाण**

**आत्मा मालिक ध्यानपीठ कोकमठाण**

## आयोजक

**आत्मा मालिक ध्यान योग मिशन, कोकमठाण**

मु.पो. कोकमठाण, शिर्डी–कोपरगांव रोड, ता. कोपरगांव

* प्रेषक *

**संपादक, मासिक ॐ गुरुदेव**

**विश्वात्मक जंगली महाराज आश्रम ट्रस्ट, कोकमठाण,**

मु.पो.कोकमठाण (चैतन्यपुरी), शिर्डी–कोपरगांव रोड,
ता. कोपरगांव, जि. अहमदनगर (महाराष्ट्र)–४२३६०१